रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २४४ ॥ पृष्ठे ८+४ www.krushival.in




# कृषीवल

रायगड ॥ गुरुवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹

## अलिबाग तालुक्यात कोरोनाचे १९ रुग्ण

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यात बुधवारी ९ फेब्रुवारी रोजी कोरोनाच्या १९ नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. उपचारादरम्यान दोन रुग्णांचा मृत्यू झाला तर २८ रुग्णांनी कोरोनावर यशस्वी मात केली असल्याची माहिती अलिबाग तहसीलदार कार्यालयातून देण्यात आली आहे. आजपर्यंत तालुक्यात कोरोना बाधित रुग्णांची संख्या २३ हजार १०० झाली आहे. यापैकी ६२७ रुग्णांचा मृत्यू झाला असून, २२ हजार २६३ रुग्ण कोरोनातून बरे झाले आहेत. सद्यस्थितीत तालुक्यातील २१० पॉझिटीव्ह रुग्णांवर उपचार सुरु असल्याची माहिती तहसील कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

# शेकापचा दणका!

## अलिबाग-रामराज-रोहा रस्त्याच्या कामाला सुरुवात

### चित्रलेखा पाटील यांचे प्रवाशांकडून आभार

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग-रामराज-रोहा रस्त्याचे रखडलेले काम त्वरित सुरु करण्याच्या मागणीसाठी शेकाप महिला आघाडीप्रमुख नगरसेविका चित्रलेखा पाटील आणि तालुका चिटणीस अनिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयावर मंगळवारी (दि.८) हल्लाबोल करण्यात आला. जर तातडीने हे रखडलेले काम सुरु करण्यात आले नाही, तर शेकापक्षाच्या वतीने उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यावेळी देण्यात आला होता. शेकापची आक्रमक भूमिका पाहून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी बुधवारपासून या रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे सर्वस्तरातून शेकाप व महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांचे आभार मानण्यात आले.



अलिबाग-रामराज-रोहा या अनेक वर्षे रखडलेल्या रस्त्याच्या कामाला शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील आणि तत्कालिन आ. पंडित पाटील यांनी मंजुरी मिळवून आणली. मात्र, राजकारण करीत सदर रस्त्याच्या कामाला तत्कालिन सेना-युती सरकारने सुरुवात करुन दिली नाही. शेवटी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली पुरोगामी युवक संघटनेने रस्त्यावर उतरत रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनाच्या तडाख्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने सदर रस्त्याचे काम सुरु करण्याचे आश्वासन मुख्य अभियंता सुखदेवे यांनी आंदोलनस्थळी येऊन दिले होते. त्यानुसार काही दिवसातच सदर रस्त्याचे काम सुरु करण्यात आले.

मात्र काही दिवसांतच ते बंद पडले. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांचा संताप अनावर झाला आहे. महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील आणि तालुका चिटणीस अनिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेकापक्षाच्या शिष्टमंडळाने लक्षवेधी इशारा देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयावर धडक दिली. कसलेही जबाबदार उत्तर देऊ न शकणाऱ्या या कर्मचाऱ्यांना शेकापच्या नेत्यांनी खडेबोल सुनावत तातडीने वरिष्ठांना कार्यालयात बोलावण्याच्या सूचना केल्या. त्यावर मोबाईलवरुन कंत्राटदार आणि अभियंता डोंगरे यांच्यात संभाषण होऊन शिष्टमंडळाला लगेच काम सुरु करण्याचे आश्वासन देण्यात आले.

## आंबेत पूल पुन्हा धोकादायक

## *दुरुस्तीसाठीचे १२ कोटी गेले पाण्यात*

***। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।***

*रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणारा सावित्री नदीवरील आंबेत पूल वाहतुकीसाठी पुन्हा बंद करण्यात आला आहे. गेल्या वर्षीच या पुलाची दुरुस्ती करण्यात आली होती. मात्र पुलाचे खांब धोकादायक असल्याची बाब समोर आल्याने या मार्गावरील वाहतूक पुन्हा बंद करण्यात आली आहे. यासाठी खर्च करण्यात आलेले १२ कोटी पाण्यात गेले आहेत.*



■ (संग्रहीत छायाचित्र)

*रायगड जिल्ह्यातून रत्नागिरीतील दापोली, मंडणगड व खेड या तीन तालुक्यांना जोडणारा आंबेत पूल धोकादायक बनल्याने दुरूस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतले होते. जवळपास बारा कोटी रुपये खर्चून या पुलाची दुरुस्ती करण्यात आली होती. यासाठी वर्षभर वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. दुरुस्तीनंतर पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत हा पूल वाहतुकीसाठी पुन्हा खुला करण्यात आला होता.*

*मात्र आता पुन्हा एकदा पूलाचे*

### नागरिकांची गैरसोय

**वाहतूक पूर्णपणे बंद ठेवल्याने एस टी महामंडळाच्या बसेस, नागरिक, विद्यार्थी तसेच पर्यटकांची मोठी गैरसोय होणार आहे. मंडणगड, दापोली तालुक्यात जाणाऱ्या नागरिकांना महाड मार्गे जावे लागणार आहे. सावित्री नदीवरील आंबेत या ठिकाणी नवीन पूल उभारावा अशी स्थानिकांची मागणी केली आहे.**




### महावीर चौक ते जुनी नगरपालिका मार्ग चकाचक

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग शहरातील महावीर चौक ते जुनी नगरपालिका दरम्यान रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करण्यात आले आहे. सदर रस्ता खराब झाल्याने नगरपालिकेच्या वतीने नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या प्रयत्नाने सदर रस्त्याच्या कामाला सुरूवात करण्यात आली. रस्त्याच्या कामामुळे अलिबाग शहरातील नागरिकांनी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांना धन्यवाद दिले आहेत.

## सरकारी जागेत माहिती कार्यालये

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यात विभागीय व जिल्हा माहिती कार्यालयांच्या इमारती व माहिती भवन उभारुन माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिक बळकटीकरण करण्याचा निर्णय झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

राज्यात आठ विभागीय माहिती कार्यालये आहेत. परंतू बहुतांश माहिती कार्यालये भाड्याच्या जागेत असून अप्रत्यक्षपणे त्याचा परिणाम कामकाजावर होत आहे. याची दखल घेत हा निर्णय घेण्यात आला.

## 'हिजाब'चे पडसाद महाराष्ट्रात

### सोलापूर-विजापूर महामार्गावर 'रास्ता रोको'




**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

कर्नाटकामध्ये हिजाबवरुन वादंग निर्माण झाला असतानाच त्याचे तीव्र पडसाद महाराष्ट्रातही उमटू लागलेले आहेत.

सोलापूर-विजापूर महामार्गावर रास्ता रोको करण्यात आला. यामुळे वातावरण कमालीचे तंग बनले. बीडमध्ये आता हिजाबच्या समर्थनार्थ एमआयएम पक्षाच्या वतीने बॅनर लावण्यात आले आहेत. लातूर जिल्ह्यातल्या निलंगा इथे महिलांनी कर्नाटकमध्ये घडलेल्या घटनेचा निषेध केला. निलंगा शहरातल्या मुस्लिम महिलांनी एकत्र येत हिसाब बाबत घडलेल्या घटनेचा निषेध केला आहे.

बीडमधील बशीरगंज चौकात एमआयएमकडून हिजाबच्या समर्थनार्थ बॅनर लावण्यात आले होते. पहले हिजाब, फिर किताब अशा आशयाचे बॅनर लावण्यात आले होते. नांदेडमध्ये सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी बजरंग दलाचा निषेध केला. सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

### कर्नाटकात शैक्षणिक संस्था बंद

**कर्नाटकमधील उडपी येथील सरकारी कॉलेजमध्ये काही मुस्लीम मुलींनी हिजाब घातल्याने त्यांना महाविद्यालयामध्ये प्रवेश नाकारण्यात आल्याची घटना घडली आहे. तणाव वाढू लागल्याने मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर केला.**

> **"कॉलेज आम्हाला अभ्यास आणि हिजाब यापैकी एक निवडण्यास भाग पाडत आहे. मुलींना हिजाबमध्ये शाळेत प्रवेश नाकारला जाणं, हे खूप भयावह आहे. महिलांनी काय घालावं, काय नको याची वृत्ती आजही कायम आहे. याबाबत भारतीय नेत्यांनी मुस्लिम महिलांकडं होणारं दुर्लक्ष थांबवलं पाहिजे.**
> **– मलाला युसुफजई सामाजिक कार्यकर्ती, पाक**

> **"काय परिधान करायचं हा महिलांचा अधिकार आहे. मग ते बिकिनी असेल किंवा घुंगट, जिन्स असेल किंवा हिजाब. त्यांनी काय घालायचं हे तुम्ही ठरवू शकत नाही. हा भारताच्या संविधानाने महिलेला दिलेला अधिकार आहे. महिलांचं शोषण करणं, तिचा छळ करणं थांबवा.**
> **– प्रियंका गांधी, काँग्रेस नेत्या**

## म ह त्त्वा चे

### नितेश राणे यांना जामीन मंजूर

**। कणकवली । प्रतिनिधी ।**

शिवसैनिक संतोष परब यांच्यावर झालेल्या हल्ला प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेल्या आमदार नितेश राणे यांना बुधवारी (९ फेब्रुवारी) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.व्ही. हांडे यांच्या न्यायालयाने जामीन मंजूर केला. ३० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर हा जामीन मंजूर झाला. नितेश राणे यांचा स्वीय सहाय्यक राकेश परब यांनाही जामीन मिळाला आहे. यावर अधिक भाष्य करणार नसल्याचे निलेश राणे यांनी म्हटले आहे.

### शरद पवारांना आयोगाची नोटीस

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भीमा-कोरेगाव प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची साक्ष नोंदवण्यात येणार आहे. शरद पवार यांनी एल्गार परिषद प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली होती. त्यात त्यांनी कोरेगाव भीमाबद्दल काही माहिती दिली होती. त्यानंतर पवारांचा जबाब नोंदवण्याची मागणी आयोगाकडे करण्यात आली होती. याआधीही जुलै महिन्यात शरद पवार यांना चौकशीसाठी बोलावण्यात आलं होतं. आता पुन्हा एकदा २३ फेब्रुवारी रोजी शरद पवार यांची साक्ष नोंदवली जाणार आहे.

### हिंगणघाटकांड प्रकरण आज निकाल

**। हिंगणघाट । प्रतिनिधी ।**

संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या हिंगणघाट जळीतकांड प्रकरणी आरोप सिद्ध झाले असून कोर्टाने आरोपीला दोषी ठरवले आहे. कोर्ट गुरुवारी आरोपीला शिक्षा सुनावणार असल्याची माहिती सरकारी वकील उज्वल निकम यांनी दिली आहे. आज या खटल्याचा निकाल येणार असल्याने संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष सुनावणीकडे लागलं होतं. एकतर्फी प्रेमप्रकरणातून युवतीला जिवंत जाळले होते.

### विमानाच्या इंजिनाचा भाग कोसळला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईहून उड्डाण करताना एअर इंडियाच्या विमानाच्या इंजिनाचा एक भाग कोसळला आहे. विमानाने मुंबईहून उड्डाण केल्यानंतर इंजिनच्या काउलिंगचा काही भाग कोसळला आहे. यानंतर अलायन्स एअरचे विमानची भुजमध्ये इमरजन्सी लँडिंग करण्यात आली. नागरी उड्डाण मंत्रालयाने इंजिन काऊलिंग कसे काय कोसळले याची चौकशी होणार आहे असे सांगितले.

## दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंग

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

आईस्क्रीमचा बहाणा करत दोन अल्पवयीन मुलींशी अश्लिल चाळे करणाऱ्या उमेदभाई ऊर्फ उमेश मगनभाई हरिजन (वय ३७, रा. शिळफाटा) याला अटक करण्यात आली आहे. न्यायालाने चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

आरोपी उमेदभाई आणि पीडित अकरा वर्षे व नऊ वर्षीय मुली पटेलनगर नॅशनल गॅरेज शिळफाटा खोपोली येथे एकाच गल्लीमध्ये समोरासमोर राहण्यास आहेत. उमेदभाई याने पीडित मुलींना आईस्क्रिमच्या बहाण्याने घरात नेऊन पिडीत मुलींसोबत अश्लिल वर्तन केले. सदर प्रकार कोणला सांगितला तर मार पडेल अशी धमकी उमेदभाई यांनी दिली. त्यामुळे भीतीपोटी मुलींनी सदरचा प्रकार घरात सांगितला नाही. परंतु मुलींच्या वागण्यातील फरक मुलींच्या आईनी ओळखून विश्वासात घेऊन चौकशी केली असता धक्कादायक प्रकार उघडकीस आला. मुलींच्या पालकांनी थेट पोलीस ठाणे गाठत आरोपी उमेदभाई हरिजन विरोधात तक्रार दिली. पोलिसांनी तातडीने कारवाई करत अटक केली आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक हरिश काळसेकर हे करीत आहेत.

## स्व. लतादीदी मंगेशकर यांना आज संगीतमय श्रद्धांजली

### पीएनपी नाट्यगृहाचे आयोजन

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

गानकोकिळा, भारतरत्न, महाराष्ट्रभूषण स्व लतादीदी मंगेशकर यांना पीएनपी नाट्यगृहाच्यावतीने गुरुवारी १० फेब्रुवारी रोजी ठीक संध्याकाळी ६ वाजता संगीतमय श्रद्धांजली वाहण्यात येणार आहे.

मेरी आवाज ही पेहचान है, असे अभिमानाने सांगत गेली सत्तर वर्षाहून अधिक काळ समस्त भारतीयांच्या मनावर आपल्या स्वरांनी मोहिनी घालणाऱ्या गानकोकिळा, भारतरत्न, महाराष्ट्रभूषण लतादीदी मंगेशकर यांनी रविवारी या जगाचा निरोप घेतला आणि स्वररुपी युगाचा अंत झाला. दीदी सदैव सर्वांच्या स्मरणात राहतील. त्यांना पीएनपी नाट्यगृहाच्या वतीने संगीतमय श्रद्धांजली वाहण्यासाठी गुरुवारी १० फेब्रुवारी रोजी ठीक संध्याकाळी ६ वाजता आपण नाट्यगृहाचे सभासद आणि पदाधिकारी म्हणून आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन पीएनपी सहकारी सांस्कृतिक कला विकास मंडळाच्या अध्यक्षा चित्रलेखा नृपाल पाटील यांनी केले आहे.








## अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१० फेब्रुवारी**

१) श्री. बाळाराम भाऊ खरवले
१०-०२-१९४०
पोस्ट-गल्ली, अलिबाग

२) श्रीम. पुष्पलता प्रभाकर पाटील,
१०-०२-१९४३
मु.बांधण, ता.अलिबाग

३) श्री. भानुविलास दत्तात्रेय म्हात्रे
अलिबाग
१०-०२-१९५३

४)श्री.रजनीकांत बामा सखे
१०-०२-१९५७
मु.नवेदर नवगाव, अलिबाग

# शेकाप नगरसेवक निधीतून विकासकामांचा धडाका

## विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांची उपस्थिती

**। पनवेल । प्रतिनिधी।**

पनवेल मनपातील शेकाप नगरसेवकांच्या विकासनिधीतून विविध विकासकामांचा धडाका असून, विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते नगरसेवक निधीतून बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमीपूजन पार पडले.

विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्या नगरसेवक निधीतून शहरातील पायोनियर, पाण्याच्या टाकी शेजारी, बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमीपूजन, नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर यांच्या नगरसेवक निधीतून प्रभाग क्र. १८ येथे विविध ठिकाणी उभारलेल्या हायमास्टचे लोकार्पण, नगरसेविका कुसुम गणेश पाटील यांच्या नगरसेवक निधीतून खांदा कॉलनी येथील सेक्टर ६, विरंगुळा केंद्र, अष्टविनायक हॉस्पिटल शेजारी बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमीपूजन, नगरसेविका सारिका अतुल भगत यांच्या नगरसेवक निधीतून खांदा कॉलनी येथील मूळगंधकुटी बुद्धीविहार समोर बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमीपूजन, शंकर पाटील यांच्या नगरसेवक निधीतून कामोठे येथील सेक्टर ५ गार्डन बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमीपूजन, नगरसेविका कमल महादेव कदम यांच्या नगरसेवक निधीतून कळंबोली शहरातील के.ग्रुप मैदान, सेक्टर ३, सी.ग्रुप मैदान, सेक्टर ३ व छत्रपती शिवाजी महाराज राजे मैदान, सेक्टर २ ई येथे बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमीपूजन व सेक्टर २ हनुमान मंदिर येथे बांधण्यात येणाऱ्या पाणपोईचे भूमीपूजन, नगरसेविका प्रज्योती प्रकाश म्हात्रे यांच्या नगरसेवक निधीतून टेंभोडे बस स्टॉप शेजारी, नवीन पनवेल सेक्टर ६, खिडुकपाडा, साई मंदिर शेजारी व आसूडगाव शाळेचा मैदान येथे बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमीपूजन, नगरसेविका उज्वला विजय पाटील यांच्या नगरसेवक निधीतून तोंडरे, विठ्ठल रखुमाई मंदिर शेजारी बांधण्यात येणाऱ्या खुली व्यायामशाळेचे भूमीपूजन पार पडले. यावेळी विरोधी प्रीतम जनार्दन म्हात्रे, शेकाप जिल्हा चिटणीस गणेश कडू, मा.उपनगराध्यक्ष गणेश पाटील, माधुरी गोसावी, गोपाळ भगत, प्रकाश म्हात्रे, सखाराम पाटील, शंकर म्हात्रे, .प्रमोद भगत, डी.पी.म्हात्रे, डॉ.सुरेखा मोहोकर, कुसुम पाटील, कमल कदम, प्रीती जॉर्ज, सारिका अतुल भगत,उज्वला विजय पाटील, प्रिया विजय भोईर तसेच शेकाप पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.



# पोलादपूर नगरपंचायत नगराध्यक्ष निवड आज

**। पोलादपूर । प्रतिनिधी।**

पोलादपूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षव उपनगराध्यक्ष पदासाठीची निवडणूक १० फेब्रुवारीला दुपारी होणार आहे. नगराध्यक्षपदाच्या काँग्रेस आघाडीच्या उमेदवार आशा गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज बुधवारी मागे घेतला असून चोळईतील व्हाईट हाऊसमध्ये शिवसेना आणि काँग्रेसचे नेते एका कारखान्याच्या विस्तारीकरणासंदर्भात एकाच व्यासपिठावर आजच येणार असल्याने महाआघाडीच्या सत्तास्थापनेची ही नांदी मानली जात आहे. पोलादपूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसंदर्भात काँग्रेसतर्फे आशा सचिन गायकवाड आणि शिवसेनेतर्फे सोनल प्रकाश गायकवाड यांचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. यापैकी बुधवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास आशा गायकवाड यांनी नगराध्यक्षपदाचा उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने गुरूवारी ही निवड बिनविरोध होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## दामोदर मोरे यांचे निधन

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

चेंढरे येथील दामोदर शंकर मोरे यांचे नुकतेच निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, दोन मुली, जावई, भाऊ भावजय, पुतणे-पुतणी, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.



किते हितवर्धक भंडारी समाजाचे क्रियाशिल कार्यकर्ते संतोष मोरे यांचे ते वडिल होत. दामोदर शंकर मोरे यांनी मुंबई येथील नवशक्ती प्रेसमध्ये अनेक वर्षे सेवा केली. सेवानिवृत्ती नंतर ते अलिबाग येथे आल्यानंतर त्यांनी काही काळ प्रेस मध्ये काम केले. परिसरात ते दादा म्हणून परिचित होते. त्यांना सामाजिक कार्याची प्रचंड आवड होती. भंडारी समाजाबद्दल त्यांना खूप तळमळ होती. तसेच भंडारी समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते तोडणकर गुरुजी, वास्तुविशारद शशिकांत मोहिते, किते भंडारी हितवर्धक समाजाचे अध्यक्ष बळवंत शिर्सेकर यांच्याशी त्यांचे सलोख्याचे संबंध होते. बैलगाडी शर्यतीचे ते रसिक होते. १९८५ पासून बैलगाडी शर्यतीत त्यांचा सक्रीय सहभाग असायचा. त्यांच्यावर श्रीबाग येथील वैकुंठधाम मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

## धर्माजी पालकर यांचे निधन

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

धर्माजी चांगू पालकर यांचे निधन झाले. ते मुळगाव रामराज सध्या रोहिदास नगर चेंढरे येथे राहत होते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातून सेवानिवृत्त झाले होते. सामाजिक कार्यकर्ते संतोष पालकर यांचे ते वडील होते. मृत्युसमयी त्यांचे वय ७६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शेकापचे ते कट्टर समर्थक होते. त्यांचे उत्तरकार्य २० फेब्रुवारी राहत्या घरी होणार आहे.



त्यांच्या अंत्ययात्रेला जि.प. माजी सदस्य संजय पाटील, रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक ॲड परेश देशमुख, चेंढरे माजी उपसरपंच यतीन घरत, प्रशांत फुलगावकर आदी उपस्थित होते.


अर्जदारातर्फे ॲड.गौरी गिरीश म्हात्रे

**जाहीर नोटीस**

**अलिबाग येथील मा.मुख्य न्यायदंडाधिकारी सो.यांच्या कोर्टात**

क्रि.चौकशी अर्ज २५५/२०२०

श्री.अरविंद बाबू पाटील — अर्जदार

विरूध्द

ग्रुप ग्रामपंचायत शहापूर — सामनेवाला

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार हा वरील पत्यावर राहत असून अर्जदार यांचे वडिल कै.बाबू धोंडू पाटील यांचा मृत्यू रा.धाकटे शहापूर, पो.मोठे शहापूर, ता.अलिबाग, जि.रायगड येथे झालेला आहे. हे या गावचे रहिवासी होते. अर्जदार यांच्या आईचा मृत्यू दिनांक ०७/०६/१९७९ रोजी झाला आहे. अर्जदार यांच्या वडिलांचा मृत्यू रा.धाकटे शहापूर, पो.मोठे शहापूर, ता.अलिबाग, जि.रायगड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या वडिलांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत शहापूर यांच्या जन्म मृत्यू रजिस्टर मध्ये नोंद नाही. त्यामुळे त्यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरीता मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि.२२/२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा मे.कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे.कोर्ट अर्जदाराच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदार यांच्या वडिलांच्या मृत्यूची नोंद करण्याबाबत संबंधित ग्रुप ग्रामपंचायत शहापूर यांना आदेश देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ५/२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **क.लिपिक** **मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट अलिबाग रायगड**

(कोर्टाचा शिक्का)

सही/- **स.अधिक्षक** **मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट अलिबाग-रायगड**

अर्जदारातर्फे ॲड.गौरी गिरीश म्हात्रे

**जाहीर नोटीस**

**अलिबाग येथील मा.मुख्य न्यायदंडाधिकारी सो.यांच्या कोर्टात**

क्रि.चौकशी अर्ज २५४/२०२०

श्री.अरविंद बाबू पाटील — अर्जदार

विरूध्द

ग्रुप ग्रामपंचायत शहापूर — सामनेवाला

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार हा वरील पत्यावर राहत असून अर्जदार यांची आई कै.काशिबाई बाबू पाटील हिचा मृत्यू रा.धाकटे शहापूर, पो.मोठे शहापूर, ता.अलिबाग, जि.रायगड येथे झालेला आहे. अर्जदार यांची आई ही या गावची रहिवासी होती. अर्जदार यांच्या आईचा मृत्यू दिनांक ०१/०२/१९७९ रोजी झाला आहे. अर्जदार यांच्या आईचा मृत्यू रा.धाकटे शहापूर, पो.मोठे शहापूर, ता.अलिबाग, जि.रायगड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या आईच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत शहापूर यांच्या जन्म मृत्यू रजिस्टर मध्ये नोंद नाही. त्यामुळे त्यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरीता मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि.२४/२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा मे.कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे. कोर्ट अर्जदाराच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदार यांच्या वडिलांच्या मृत्यूची नोंद करण्याबाबत संबंधित ग्रुप ग्रामपंचायत शहापूर यांना आदेश देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ५/२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- **क.लिपिक** **मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट अलिबाग रायगड**

(कोर्टाचा शिक्का)

सही/- **स.अधिक्षक** **मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट अलिबाग-रायगड**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या दुकानी गाळ्याचे विद्यमान मालक श्री.शशांक नारायण पाटील, रा.वसंत व्हीला, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेला दुकानी गाळा माझे अशिल यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत निर्वेध आहे असा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौज अलिबाग, ता.अलिबाग,नगरपालिका अलिबागमधील सि.स.नं.९२३ बी+९२४के, ९२३ बी या मिळकतीवरील बांधण्यात आलेल्या ‘शुक्रतारा को.ऑप.हौसिंग सोसायटी मर्या.,अलिबाग’ व म्युनसिपल घर क्र.१४४० या बहुमजली इमारतीमधील तळमजल्यावरील दुकानी गाळा क्र.१ (एक) अलिबाग नगरपरिषद नवीन मालमत्ता क्र. Z1BHA001707, क्षेत्र ४२२.५० चौ.फूट (३९.२६ चौ.मी.) हा दुकानी गाळा.

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, ताबा, कब्जा, बयाणा पावती, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बोजा, बक्षिस, मृत्यूपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लिएन, अन्नवस्त्र-पोटगी, वारसाहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील सही करणार यांचेकडे त्यांचे नमूद पत्त्यावर कळवावी. या नोटीसमध्ये नमूद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात न कळविल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे असे गृहीत धरून माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भाच्या नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक.०९/०२/२०२२

सही/-
**ॲड.जयवंत हरिश्चंद्र घरत**
पत्ता-बी/१०२, ‘चित्रा-तारांगण’
महर्षी कर्वे रोड, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, मौजे. वांजळे ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली प्लॉट मिळकत व त्यात असणारी घर मिळकत आमचे अशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे वांजळे कर्जत जि.रायगड येथील प्लॉट मिळकत व घर मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | स.न. | प्लॉट नं | क्षेत्र चौ.मी | आकार (रू.पै.) | घर मिळकतीचे वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| मॉरिस इग्नरॅस गोन्सालविस | १७६ | १६ | ३१८-८ | ३१-८८ | ग्रुप ग्रामपंचायत किरवली हद्दीतील मौजे वांजळे येथील घर क्रमांक १४४ क्षेत्र १५०० चौ.फुट |

सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

कर्जत
तारीखः०९/०२/२०२२
मो.नं. ८००७८३७६५६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड.महेश कमलाकर थोरवे**
मु.अंजप ता.कर्जत जि.रायगड

**जाहीर नोटीस**

नि.७/ड

अर्जदारातर्फे ॲड. रा.म.कुंटे

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात,**

दिवाणी चौकशी अर्ज ०७/२०२२
(प्रोबेट अर्ज)

श्री. प्रसाद विनायक बापट, ... अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही ... सामनेवाले

ज्याअर्थी विद्याधर दत्तात्रेय कुंटे हे तारीख २४-०१-२०२१ रोजी अलिबाग येथे मयत झाले असून, त्यांचे तारीख १९-०८-२०१३ रोजीच्या आणि तारीख २०-०८-२०१३ रोजी नोंदणी केलेल्या मृत्यूपत्राबाबत प्रोबेट मिळणेकरिता अर्जदार यांनी अलिबाग येथील दिवाणी कोर्टात अर्ज केला आहे. सदर अर्जाद्वारे अर्जदार जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी अलिबाग नगरपरिषदेचे हद्दीतील, मौजे अलिबाग येथील शांतादुर्गा को.ऑप.हौसिंग सोसायटी या इमारतीमधील तळमजल्यावरील (जुना मालमत्ता क्रमांक १४४४ आणि नवीन मालमत्ता क्रमांक Z1MKT001711) निवासी गाळा क्रमांक १ या निवासी गाळ्यामधील निम्मा म्हणजेच १/२ अविभक्त हिस्सा व सहकारी संस्थेचे हक्कभाग, जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी अलिबाग नगरपरिषदेचे हद्दीतील, मौजे अलिबाग येथील शांतादुर्गा को.ऑप.हौसिंग सोसायटी या इमारतीमधील तळमजल्यावरील (जुना मालमत्ता क्रमांक १४४४ आणि नवीन मालमत्ता क्रमांक Z1MKT001711) निवासी गाळा क्रमांक २ हा निवासी गाळा व सहकारी संस्थेचे हक्कभाग. त्याचप्रमाणे अलिबाग येथील बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेचे मुदतबंद ठेवींमध्ये गुंतविलेल्या रक्कमेची एक एफ.डी.पावती क्रमांक ८२४३ मध्ये गुंतविलेली रक्कम, बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक २०१०९६३४४३६ या खात्यामधील ठेव आणि मृत्यूसमयी त्यांचेजवळ असणारी रोख रक्कम, दागिने, घड्याळ आणि सर्व वापरातील चीजवस्तू याबाबत प्रोबेट मागत आहेत. सबब तसे प्रोबेट अर्जदार यांस देणेसंबंधी कोणाच्या काही हरकती असल्यास त्यांनी लेखी स्वरुपांत तारीख ०७-०३-२०२२ रोजी मे. कोर्टात दाखल कराव्यात अन्यथा अर्जदारास प्रोबेट दिले जाईल.

आज दिनांक ०८-०२-२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे सहीनिशी दिली.

**कनिष्ठ लिपिक** **दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर** **रायगड-अलिबाग**

(कोर्टाचा शिक्का)

**अधिक्षक** **दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर** **रायगड-अलिबाग**

# ग्रुप ग्रामपंचायत सारसोली

**ता. रोहा, जि. रायगड**

दिनांक :- ०४-०२-२०२२

निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत सारसोली हद्दीतील खालील विकास कामे १५ वा वित्त आयोग ग्रामपंचायत स्तर/अनु.जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास योजना निधीतून हाती घेतले आहे. सदर कामास ग्रामपंचायत मासिक सभा व ग्रामसभेने प्रशासकीय मान्यता दिली असून, अंदाजपत्रकात मा. उपअभियंता (बांधकाम) उपविभाग रोहा यांनी तांत्रिक मंजुरी दिली असून, सदर काम करणेसाठी नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | कामपूर्ण करणेचा कालावधी | निविदा सादर करणेची अंतिम दिनांक | वेळ | ठिकाण | १% इसारा रक्कम | ५% प्रतिभूती रक्कम (सुरक्षा अनामत) | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत हद्दीतील विहिरींना जाळी बसविणे. | २२१३९६ | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | २२१३ | ११०६९ | २०० |
| २ | सुडकोली/नंदप विहीर पंप घर दुरुस्ती/नवीन करणे | १२०००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | १२०० | ६००० | २०० |
| ३ | टिटवी तलाव संरक्षण भिंत बांधणे | १६०००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | १६०० | ८००० | २०० |
| ४ | खडकी येथे नळ पाणीपुरवठा योजना दुरुस्त करणे | १००००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | १००० | ५००० | २०० |
| ५ | सारसोली येथे सार्वजनिक शौचालय बांधणे | २१२७९१ | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | २१२७ | १०६३९ | २०० |
| ६ | सुडकोली नंदपवाडी येथे सार्वजनिक शौचालय मुतारी बांधणे | १५८६०४ | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | १५८६ | ७९३० | २०० |
| ७ | खंदार आदिवासीवाडी येथे सार्वजनिक शौचालय बांधणे | २३०००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | २३०० | ११५०० | २०० |
| ८ | आपले सरकार सेवा केंद्र अंतर्गत ऑपरेटरचे मानधन अदा करणे. | ७०२७९ | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | ७०२ | ३५१३ | २०० |
| ९ | कॉम्प्यूटर व फर्निचर खरेदी करणे. | ५०००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | ५०० | २५०० | २०० |
| १० | टी.सी.एल. मेडीक्लोर खरेदी करणे. | २०००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | २०० | १००० | २०० |
| ११ | सुडकोली मराठी शाळा लादी मारणे. | १३०६२८ | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | १३०६ | ६५३१ | २०० |
| १२ | सारसोली मराठी शाळा दुरुस्ती करणे | १२०००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | १२०० | ६००० | २०० |
| १३ | अंगणवाडीना खेळणी पुरविणे | १०८२५१ | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | १०८२ | ५४१२ | २०० |
| १४ | सारसोली बौद्धवाडी गटार बांधणे | १३०००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | १३०० | ६५०० | २०० |
| १५ | खांदार आदिवासीवाडी मंदिर येथे पेव्हर ब्लॉक लावणे | ९१९१५ | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | ९१९ | ४५९५ | २०० |
| १६ | सुडकोली व्यायामशाळा साहित्य खरेदी करणे | २००००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | २००० | १०००० | २०० |
| १७ | स्ट्रीट लाईट वीजबिल भरणा | ८१७१८ | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | ८१७ | ४०८५ | २०० |
| १८ | एल इ डी दिवे खरेदी करणे | १००००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | १००० | ५००० | २०० |
| १९ | सोलर दिवे लावणे | १००००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | १००० | ५००० | २०० |
| २० | सारसोली येथे सार्वजनिक शौचालय बांधणे | ३००००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | ३००० | १५००० | २०० |
| २१ | खंदार आदिवासीवाडी येथे सार्वजनिक शौचालय बांधणे | ३००००० | नोंदणीकृत | ६ महिने | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजता | ग्रा.प. कार्यालय सारसोली | ३००० | १५००० | २०० |

१. कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेस पहावयास मिळतील. आवश्यक असलेली फी भरुन त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
२. प्रति निविदा दिनांक ११-०२-२०२२ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयीत उपस्थाचे सक्षम मा. सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील.
३. निविदा भरणाऱ्या ठेकेदारांनी आपल्या रजिस्टरने दाखले पाठवावे व ते सत्यप्रत केले असावेत. (महाराष्ट्र शासनकडील नोंदणी प्रमाणपत्र प्रत/इनकमटॅक्स रिटन दाखला १५१६ किंवा १६१७ प्रत/पॅनकार्ड प्रत/कामपूर्ण तत्वाचा दाखला/आधारकार्ड आवश्यक)
४. कोणतीही एक अथवा अनेक निविदा कोणतीही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी ठेवला आहे.
५. देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर व उपकाराची कपात केली जाईल. पंचायत समिती रोहाकडील यांच्या तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे सदस्य यांचे मार्गदर्शन व यांच्या देखरेखी खालील सदर कामे करणे असून काम संधानकारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
६. काम अंतिम पूर्ण झाल्यावर ६ महिन्यापर्यंत देखभाल दुरुस्ती ठेकेदारांनी करण्याचे असून त्यानंतर सुरक्षा अनामत केली जाईल.
७. उपलब्ध निधीप्रमाणे सदर कामाचे रक्कम अदा केली जाईल. हा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
८. निविदा पोस्टानी पाठविली जाणार नाही व दिलेली तारीख वेळ दिलेल्या वेळेपेक्षा आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
९. निविदा किंमत ना पडतावा समजावी.
१०. निविदा मंजूर केल्यास १००/- रु. स्टॅम्प पेपरवर करारनामा स्व:खर्चाने करुन घ्यावा लागेल.

सही/- **ग्रामसेवक** **ग्रुप ग्रामपंचायत सारसोली**

सही/- **सरपंच** **ग्रुप ग्रामपंचायत सारसोली**

# मरणानंतरही यातना संपेनात

**➤नावंढे आदिवासी स्मशानभूमीपासून वंचित ➤पावसात मृतदेह अर्धवट जळतात, प्रेताची होतेय विटंबना**

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

खालापूर तालुक्यातील नावंढे आदिवासीवासीवाडीला पिढ्यान्‌पिढ्या स्मशानभूमीच नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. मरणानंतरही माणसाच्या नशिबातील मरण यातना काही संपेना असेच म्हणावे लागेल. स्मशानभूमीसह प्राथमिक सेवा सुविधा मिळाव्यात यासाठी ग्रामस्थांनी अनेकदा लोकप्रतिनिधी व प्रशासनदरबारी आपली लेखी निवेदने दिली आहेत, कैफियत मांडली आहे. मात्र कुणालाही येथील ग्रामस्थांच्या वेदनेची जाणीव होत नसल्याचे येथील ग्रामस्थांनी सांगितले.



येथील वैशिष्ट्ये म्हणजे येथील ग्रामपंचायत, जिल्हापरिषद, पंचायत समितीच्या निवडणुकात आदिवासी वाडीला स्मशानभूमी देणारच असा अजेंडा घेऊन आश्वासनांची खैरात होते, मात्र या मुद्यावर मते घेऊन आम्हाला केवळ आश्वासनाचे गाजर दाखवले जाते, असा संताप येथील ग्रामस्थांनी व्यक्त केला. आता ग्रामस्थांनी एक निर्धार केला आहे की, यापुढे आदिवासी वाडीतील कुणीही मयत झाला तर त्या प्रेताचा अंत्यविधी ग्रामपंचायतीच्या प्रांगणात करणार असा इशारा संतप्त आदिवासींनी प्रशासनाला दिला आहे. स्वातंत्र्याची ७५ वर्षे उलटून गेली तरीही ग्रामस्थ स्मशानभूमी पासून वंचित आहेत. स्मशानभूमी अभावी मृतदेहांची विटंबना होणे, अंत्यसंस्कारासाठी भटकावे लागणे ही बाब अतिशय संतापजनक आहे. शासनाने त्वरित येथे स्मशानभूमी बांधावी. तसेच अन्य मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी आदिवासी बांधवांनी केलीय.

**स्मशानभूमीचा प्रश्न जैसे थेच**

**येथील आदिवासी वाडीला स्मशानभूमी मिळावी यासाठी ग्रामपंचायत स्थरावर ठराव पास करून कागदी घोडे नाचवले आहेत, पंचायत समिती, वनविभाग, तहसीलदार यांच्याकडे कागदपत्रे गेली आहेत, मात्र त्यासाठी आवश्यक असलेला नित्याचा पाठपुरावा होत नसल्याने स्मशानभूमीचा प्रश्न जैसे थे राहिला आहे.**

नावंढे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या आदिवासीवाडीची लोकसंख्या साधारणतः १००० च्या आसपास आहे. २०० घरांचा येथे उंबरठा आहे. येथे स्मशानभूमी नसल्याने येथील अंत्यविधीसाठी वणवण भटकावे लागत आहे. येथील एखादी व्यक्ती मरण पावली तर गावापासून काही अंतरावर मिळेल त्या जागेत मोठमोठी दगडे रचून त्याच्यावर अंत्यसंस्कार करावा लागतो. पावसाळ्यात तर अंत्यसंस्कार कुठे आणि कसे करावे हा प्रश्न पडतो. भर पावसात मृदेहांवर अंतविधी (अंत्यसंस्कार) करावा लागतो. गावापासून दिड दोन किलोमीटर खडकाळ व काटेरी मार्गावरून पायी चालत मार्ग काढत जाऊन अंत्यसंस्कार करण्याची वेळ या ग्रामस्थांवर येत आहे.



## स्टील मार्केटमधील एसी कंटेनरला आग

**। पनवेल । वार्ताहर ।**

कळंबोली स्टील मार्केट येथील भंगारात असलेल्या एका कंटेनरला अचानकपणे आग लागल्याची घटना बुधवारी (दि.९) घडली आहे.

कळंबोली स्टील मार्केट येथे लागलेल्या आगीत लपेट्यात आजूबाजूची झाडे आल्याने वृक्षराईचे मोठे नुकसान झाले आहे. सदर आगीमुळे परीसरातील लोकांची धावपळ झाली व त्यांनी तातडीने अग्नीशमनदलाला पाचारण करुन त्यांनी ही आग आटोक्यात आणली. त्यामुळे कोणतीही जिवितहानी झाली नाही. परंतु गेल्या काही दिवसांपासून वारंवार लागणाऱ्या आगीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने आगीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

---

**म ह त्वा चे**

### कै. प्रभाकर वालेकर यांना वाहिली श्रद्धांजली

**। अलिबाग । वार्ताहर ।**

ज्येष्ठ नागरिक संस्था कामार्ले विभाग वाघोलीचे अध्यक्ष तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कै.प्रभाकर वालेकर यांच्या अकाली निधनानिमित्त त्यांना ज्येष्ठ नागरिक संस्थेतर्फे वाघोली येथील ग्रामपंचायत सभागृहात श्रद्धांजली वाहण्यात आली. संस्थेचे प्रभारी अध्यक्ष ब.रा. वाघपंजे अध्यक्षस्थानी होते. याच सभेत स्वर सम्राज्ञी लतादीदी यांनाही आदरांजली वाहण्यात आली. संस्थेचे दिवंगत अध्यक्ष प्रभाकर वालेकर यांच्या कार्याची माहिती प्रभारी अध्यक्ष ब.रा.वाघपंजे, ज्येष्ठ सल्लागार बळवंत वालेकर, सुधाकर पाटील, ना.गो.वाघपंजे, अच्युत पाटील, हरिश्चंद्र वालेकर, प्रदीप पाटील, लीला पाटील यांनी आपल्या भाषणात दिली. या सभेस संस्थेचे सेक्रेटरी दत्तात्रेय नांदेकर, सह. सेक्रेटरी मधुकर पाटील, खजिनदार जनार्दन पाटील, दामोदर ठाकूर, वसंत पाटील, मारुती वालेकर, प्रकाश पाटील, नरेंद्र पाटील, चंद्रकांत वालेकर, बाळाराम पाटील, पुष्पा पाटील, नंदा नांदेकर, शशिकला वाघपंजे, आशीष वालेकर, दीपक वालेकर, जयंत वालेकर आदी ७० नागरिक उपस्थित होते.

### साईटवरून साहित्याची चोरी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील विंचवली येथील चेतक इंटरप्रायझेस कंपनीच्या साईटवरील १ लाख ४४ हजार ६९० रुपये किंमतीचे साहित्य आयशर टेम्पोतून आलेल्या अज्ञात चोरट्यांनी लांबवून ते फरार झाले आहेत.सदरची घटना मंगळवारी (दि.८) मध्यरात्री घडली असून याबाबतची फिर्याद सुनील विष्णू प्रसाद श्रीवास्तव (वय-५०) रा.टेंबेवाडा निजामपूर रोड, माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. सदर घटनेचा अधिक तपास माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आर.पी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार एस.जी.भोजकर हे करीत आहेत.

## महाडमधील पाच कंपन्या रडारवर

**वसाहतीमधील घनकचरा महामार्गालगत; कंपनी व्यवस्थापकांनी हात झटकले**

**। महाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील दासगाव हद्दीत महामार्गालगत सोमवारी दुपारच्या सुमारास एका अज्ञात वाहनाने औद्योगिक वसाहतीमधील घातक घनकचरा महामार्गालगत टाकून पलायन केले. ही बाब दासगाव ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी महाड औद्योगिक वसाहतीमधील प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या अधिकाऱ्यांना तातडीने कल्पना दिली.



प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक अधिकारी इंदिरा गायकवाड यांनी तात्काळ या घातक घनकचऱ्याचे नमुने घेऊन तपासणीसाठी पाठवले आहेत. तर महाड औद्योगिक क्षेत्रातील पिगमेंट तयार करणाऱ्या पाच कारखान्यांच्या व्यवस्थापकांकडून यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे.

महामार्गावर कचरा टाकल्याची कल्पना दासगाव ग्रामस्थांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिल्यानंतर त्या ठिकाणचे नमुने तपासणीसाठी गोळा करण्यात आले.

याप्रकरणी महाड औद्योगिक वसाहतीमधील पिगमेंट तयार करणाऱ्या लोना इंडस्ट्रीज, सुदर्शन केमिकल, मल्लक स्पेशालिटी, मनीराम ऑर्गेनिक, सिद्धार्थ कलरकेम या पाच कंपन्यांच्या व्यवस्थापकांना तातडीने प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या महाड येथील कार्यालयात पाचारण केले. या कंपन्यांमध्ये होणाऱ्या उत्पादनाबाबत दासगाव येथे टाकलेल्या घनकचऱ्याबाबत शहानिशा केली. मात्र यामधील पाचही कारखानदारांनी हा कचरा आपला नसल्याचे सांगितले.

> **टाकण्यात आलेल्या घनकचऱ्याचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत. पाच कंपन्यांच्या व्यवस्थापकांना चौकशीसाठी बोलावण्यात आले होते. अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल.**
> **– इंदिरा गायकवाड, उपप्रादेशिक अधिकारी, प्रदूषण नियंत्रण मंडळ महाड**

## परळीत वाहनचालकांना पोलिसांचा दणका

**३५ हजार रुपयांचा दंड वसूल**

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

पाली-खोपोली राज्य महामार्गावर असलेले परळी गाव सुधागड तालुक्याचे प्रवेशद्वार व महत्त्वाची बाजारपेठ आहे. मात्र नियमबाह्य वाहन चालकांमुळे येथे वारंवार वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत होती. जांभुळपाडा पोलीस दूरक्षेत्र पोलीसांनी वाहनचालकांवर धडक कारवाई करून ३५ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.



परळी बाजारपेठेत वाहतूक कोंडीची समस्या बिकट झाली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला अस्ताव्यस्त लावलेल्या वाहनांमुळे जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांना मार्ग मिळत नसल्याने वारंवार वाहतूक कोंडी होते. शिवाय बाजारहाट करण्यासाठी आलेल्या ग्रामस्थांना देखील रस्त्याने चालणे मुश्किल होते. या संदर्भात वारंवार परळी ग्रामपंचायत व पाली पोलीस यांनी मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. ग्रामस्थांनी देखील परळी बाजारपेठेतील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवावा अशी मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर पाली पोलिसांच्या वाहतूक शाखेने तसेच पाली पोलीस ठाणे अंतर्गत जांभुळपाडा पोलीस दूर क्षेत्राचे पोलीस यांनी संयुक्तरित्या परळी बाजारपेठेत धडक मोहिम राबविली. या मोहिमेत साधारणपणे ६७ केसेस करण्यात आल्या तर ३५ हजार रुपयांची दंडात्मक कारवाई केली गेली. यावेळी सहाय्यक फौजदार मोहन म्हात्रे, एस. एस. खेडेकर, निलेश महाडिक, कांचन भोईर, बी. एच. वाव्हळ आदी उपस्थित होते.

## पनवेल न्यायालय परिसरातील वाहतूक कोंडी फुटणार

**चारचाकींना पार्किंग करण्यास सक्त मनाई**

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहर वाहतुक शाखेच्या हद्दीतील जिल्हा सत्र न्यायालय लोखंडीपाडा व अशोकबाग आणि पनवेल तालुका पोलीस स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी चारचाकी वाहनांना नो पार्कंग करणे आवश्यक आहे. त्यामुळे पनवेल न्यायालयाच्या मार्गावर चारचाकी वाहनांना सोमवार ते शुक्रवार म्हणजेच कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी नो पार्किंगबाबत आणि दुचाकी वाहनांना सम विषम पार्कंगबाबतची अधिसुचना घोषित करण्यात आली आहे.

पनवेल शहरातील जिल्हा सत्र न्यायालयात न्यायालयीन कामकाजासंबधित येणाऱ्या व्यक्तींची चारचाकी वाहने व दुचाकी वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूस पार्किंग केली जातात. त्यातच न्यायालयाच्या आजुबाजुला असलेले हॉस्पीटल व शासकीय कार्यालये या ठिकाणी लोकांची वर्दळ जास्त असल्याने त्याचा थेट परिणाम न्यायालयाच्या रस्त्यावरील वाहतूक कोंडीवर होतो. परिणामी रुग्णवाहीका, अग्नीशमन अशा अत्यावश्यक सेवा असलेल्या वाहनांना अडथळा होण्याचे अनेक प्रसंगही घडतात. या अनुषंगाने नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या आदेशानुसार, या मार्गावर चारचाकी वाहनांना पार्किंग करण्यासंबंधी सक्त मनाई करण्यात आली आहे.

## वाळवटी-भरडखोल प्रवास बनलाय खडतर

**॥ पर्यटकांसह वाहनचालक झालेत हैराण**

**॥ त्वरीत डागडुजी करण्याची होत आहे मागणी**

**। दिघी । प्रतिनिधी ।**

दिघी-श्रीवर्धन तालुक्यातील शेखाडी मार्ग वाळवटी-भरडखोल मुख्य रस्ता खड्ड्यात गेला आहे. वैशिष्ट्यपूर्ण पर्यटन स्थळांशेजारी रस्त्याची तर अक्षरशः चाळण झाल्याने पर्यटक व वाहनचालक या खड्डेमय प्रवासाला कंटाळले आहेत.



येथील दिवेआगर, मासेमारी बंदर भरडखोल, शेखाडी, कोंडविल, आरावी बीच, श्रीवर्धन शहर व हरिहरेश्वर अशा मुख्य पर्यटनस्थळांना समुद्रकिनाऱ्यालगत जोडणारा हा मार्ग सद्या खिळखिळा बनला आहे. पर्यटनाला गती मिळावी यासाठी शासन स्तरावर अनेक योजना राबविण्यात येत आहेत. त्यासाठी जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुका आग्रही ठरत आहे. मात्र, इकडे रस्त्यांसारख्या पायाभूत सुविधांकडे अद्याप दुर्लक्ष आहे.

सद्यस्थितीत अपूर्ण डांबरीकरणामुळे भरडखोल-वाळवटी मार्गावरील टोकदार खड्डी बाहेर आली आहे. या रस्त्याकडे कोणत्याही लोकप्रतिनिधींचा लक्ष नसल्याने येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय पर्यटन दृष्टीकोनातून महत्वाचा मार्ग असल्याने मोठ्या प्रमाणात रस्त्यावर खड्डे पडल्याने पर्यटक संताप व्यक्त करतात.

या रस्त्यावरून वाहनधारकांना वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे पर्यटक व् नागरिकांना कित्येक वर्ष या रस्त्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यांची त्वरित दुरुस्ती वा डागडुजी करावी, अशी मागणी वाहनधारकांकडून व येथील ग्रामस्थांकडून होत आहे.

## दिव्यांगांना साहित्याचे वाटप

**। महाड । प्रतिनिधी ।**

महानगर गॅस लिमिटेड मुंबई यांच्या सी.आर.एस. फंडातून आणि भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम यांच्या सहकार्यातून अपंग कल्याणकारी संस्था रायगड, महाराष्ट्र आणि श्री समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्था यांच्या सहयोगाने दिव्यांगांना मोफत सहाय्यक साधन वाटप तपासणी शिबीराचे आयोजन नुकतेच करण्यात आले.



महाड येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या सभागृहामध्ये रविवारीपासून पुढील दोन दिवस शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे दिव्यांग कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष साईनाथ पवार, रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य मनोज काळीजकर, प्रहार संघटनेचे माणगाव तालुका अध्यक्ष संदीप खामगावकर आदी मान्यवर उपस्थित राहून शिबिरामध्ये सहभागी झालेल्या दिव्यांगांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर महाड तालुक्यातील दिव्यांगांना कोणत्या साहित्याची आवश्यकता आहे, याबाबतची नोंदणी करण्यात आली.

### ज्येष्ठ पत्रकार प्रवीण पुरो यांना मातृशोक

**। उरण । वार्ताहर ।**

आपलं महानगर दैनिकाचे रायगड जिल्हा आवृत्तीचे निवासी संपादक, मंत्रालय-विधीमंडळ संघाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार प्रवीण पुरो यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई पुरो (९२) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नागाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात, चार मुले, मुली, जावई, नातू असा परिवार आहे.



## माणगावात महारक्तदान शिबीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुका पत्रकार संघ, देवा ग्रुप फाऊंडेशन माणगाव, छावा प्रतिष्ठान रायगड, एस.एस.निकम इंग्लिश स्कुल अँड ज्युनिअर सायन्स कॉलेज माणगाव, माणगाव जनरल नर्सिंग कॉलेज, रोटरी क्लब ऑफ माणगाव, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना जिल्हा रायगड तालुका शाखा माणगाव, अविष्कार फाऊंडेशनइंडियारायगडता.माणगाव, नवयुवक मित्र मंडळ खांदाड, व्यापारी असोसिएशन माणगाव, टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज माणगाव, जुने माणगाव मस्जिद मोहल्ला, शिवम कॉम्प्युटर सेंटर माणगाव, उपजिल्हा रुग्णालय माणगाव, युवा क्रिकेट क्लब माणगाव, माणगाव एकता ग्रामीण टेनिस क्रिकेट असोसिएशन, श्री.शिवछत्रपती ग्रामीण टेनिस क्रिकेट असोसिएशन, नमस्कार मित्र मंडळ बोंडशेत, पालवी मित्र मंडळ इंदापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती निमित्त शनिवारी (दि.१९) महारक्तदान शिबिराचे आयोजन सरलादेवी मंगल कार्यालय माणगाव याठिकाणी सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत करण्यात आले आहे. तरी रक्तदात्यांनी रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ५५० फूट कुंडलिका सुळक्याची केली चढाई

**मॅकमोहन हुले व टीमने सर करून फडकविला तिरंगा**

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील प्रसिद्ध गिर्यारोहक व प्रस्तरारोहक मॅकमोहन हुले यांनी आपल्या गिर्यारोहक मित्रांसोबत पाटणूस गावाजवळील कुंडलिका सुळका नुकताच सर करून ५५० फुटावर भारताचा तिरंगा फडकविला. या मोहिमेसाठी टीमला छू लेंगे आसमान हे नाव दिले गेले. ही अवघड मोहिम दोन दिवस चालली. या कठीण सुळक्यावर आत्तापर्यंत अवघ्या तीन मोहीम झाल्या असून मॅकमोहन यांच्या टीमने ही तिसरी मोहिम फत्ते केली आहे.

कुंडलिका सुळका मोहिमेच्या आधी विजय वर्धन इंद्रनील खुरंगुळे, किरण बेकावडे व मॅकमोहन या गिर्यारोहकांनी या ठिकाणची पहिल्यांदा पाहणी (रेखी) केली. त्यानंतर मोहिमेची पूर्वतयारी केली गेली. सर्व साधन/तंत्र सामग्री जमवली व प्रजासत्ताक दिनी सकाळी सुळक्यावर चढाई केली. यावेळी अनेक आव्हाने प्रस्तरारोहकांना अनुभवायला मिळाली. नियमित सराव असल्याने सुरक्षेची काळजी घेऊन या सुळक्यावरील अंतिम टप्पा मॅकमोहन, इंद्रनील खुरंगुळे, योगेश विरकर या प्रस्तरारोहकांनी भारताचा ध्वज तेथे फडकवला व ध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीत गायले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त दिग्गजांच्या आव्हानांना साद घालता या टीमने पहिल्यांदाच ही खडतर मोहिम आखून यश ही मिळवले. या मोहिमेत इंद्रनील खुरंगुळे, मॅकमोहन हुले, मानतु मंत्री, कृष्णा बचुटे, योगेश विरकर, अक्षय शेलार, ओम काकडे, अभिजीत जोतकर, प्रशांत कुंभार, हे गिर्यारोहक सहभागी झाले होते.

**धोकादायक चढाई**

**या संपूर्ण चढाईमध्ये मुक्त चढाईवर जास्त भर देण्यात आला आहे. फ्रेंड्स, चोकनटस, बोल्ट, पिटोन्स, मेखा या साधनांचा परिणामकारक वापर करण्यात आला. शेवटच्या टप्प्यामध्ये ठिसूळ खडक, माती व गवत असल्याने चढाई अत्यंत धोकादायक होती. या सगळ्यांवर मात करत दोन दिवसात ही चढाई पूर्ण करत मॅकमोहन यांनी तिसरे पाऊल या सुळक्यावर ठेवले.**



## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.






**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**श्री. रविकांत रामचंद्र शिंदे, वाढदिवसानिमत्त, अलिबाग**

## संपादकीय

# शिक्षणक्षेत्राचे आखाडे

कर्नाटकच्या किनारपट्टी भागातील उडुपी तालुक्यात एका सरकारी उच्च माध्यमिक शाळेत मुस्लिम विद्यार्थिनींनी हिजाब म्हणजे डोक्यावर पदर ठेवण्याला आक्षेप घेतल्याबद्दल त्याबाबत ठाम भूमिका घेतल्याने शिक्षणाचे पवित्र आवार हे राजकीय आखाड्यात बदलले असून हा प्रश्न आता शालेय विभागाच्या पलिकडे जाऊन उच्च न्यायालयात पोचला आहे. तसेच शाळांचे राजकीय आखाडे होण्याचे लोण केवळ उडुपी शहरांतील अन्य उच्च महाविद्यालयातच नव्हे तर अनेक राज्यांत पसरले आणि हा विषय आंतरराष्ट्रीय पातळीवरही दखलपात्र ठरला. त्यावर विविध अंगाने मते मांडली जात असून यात धार्मिकता जपण्यापासून व्यक्तिगत अभिव्यक्तीचा आविष्कारापर्यंत त्याच्या चर्चा होत आहेत. मुस्लिम मुली डोके पदराने झाकण्याबद्दल आग्रही असल्याने त्यांचे वर्गमित्र किंवा सहअध्यायी तरुण भगवी उपरणी आणि फेटे घालून आले. काही मुलींनीही डोक्यावरून भगवे पदर पांघरले. यात शाळेत धार्मिकता आणता कामा नये; शाळेतील गणवेशाचे नियम पाळले पाहिजेत. आदी युक्तिवाद मुस्लिम मुलींच्या भूमिकेच्या विरोधात केला जात आहे. तर शालेय विभागाचे नियम हे घटनाबाह्य आहेत; भेदभाव करणारे आहेत; उद्या एखादा शिख विद्यार्थी आला तर त्याला तोच नियम सांगून फेटा बांधण्याचा अधिकार काढून घेतला जाणार का, असा युक्तिवाद केला जात आहे. तसेच, शाळा परिसर हा धर्मनिरपेक्ष असायला हवा, असा युक्तिवाद सगळेच करत आहेत. या महाविद्यालयाचे मुख्याध्यापक कपाळावर टिळा लावून भारत हा हिंदू राष्ट्र आहे असे प्रसारमाध्यमांना सांगतानाही ते शाळा परिसरात धर्मनिरपेक्ष वातावरण असायला हवे तसेच मुस्लिम मुलींनी येथे शिक्षणासाठी यावे, धार्मिकता जपण्यासाठी नाही, असे सांगत आहेत. त्याबद्दल मुस्लिम मुलींचे असे म्हणणे आहे की त्यांच्या हिजाब वापरण्याला सुरू झालेला विरोध हा अलिकडचा आहे. काही शिक्षिका त्यांच्या डोक्यावरील पदर खेचून काढत असून त्यामुळे तो पदर घट्ट बसण्यासाठी लावलेली सेफ्टी पीन निघून अनेकदा डोक्याला इजाही होते. त्यांच्या मते, शाळेत गणपतीपासून अनेक हिंदू धार्मिक सण होतात, त्याबद्दल आम्ही जसे काही बोलत नाही, तसे त्यांनीही त्यांच्या या हिजाब वापरण्याकडे दुर्लक्ष करायला हवे. मुस्लिम स्त्रियांना डोक्यावर पदर घेण्याचा, बुरखा घालण्याचा आग्रह असो की हिंदू स्त्रियांना कुंकू लावणे किंवा मंगळसूत्र घालणे असो, हे स्त्रीच्या दमनाचेच आणि पुरुषसत्ताक समाजाने लादलेले निकष आहेत. तसेच कोणत्याही धार्मिक बाबींचे शाळा कॉलेज परिसरात प्रदर्शन करणे याला विरोधच असायला हवा. मग ते हिजाबचा आग्रह असो की सत्यनारायणाच्या पूजेसारखे अंधश्रद्धांचे प्रकार किंवा संस्कृतीच्या नावाखाली केले जाणारे कोणतेही धार्मिक सण. विद्येच्या प्रांगणात केवळ राष्ट्रपुरुष, सुधारणावादी संत, वैज्ञानिक यांचीच छायाचित्रे, प्रतिमा असायला हव्यात. परंतु महाविद्यालयानंतर आता शाळेत फुटीरपणाला खतपाणी घालण्याचे प्रकार सुरू असून देशपातळीवर जे काही पेरले जात आहे त्याचे अनुकरण स्थानिक पातळीवर राजकीय नेते करीत आहेत. त्याचे परिणाम काही महिन्यांपूर्वी आंध्र प्रदेशात दलित महिलेने बनवलेले पदार्थ न खाण्याचा निर्णय शाळेतील मुलांनी घेतला होता. हा भेदभावाचा विषय शाळेत जाणाऱ्या कोवळ्या वयांतील आणि निष्पाप मुलांच्या मनात कोणीतरी भरवल्याशिवाय आला असेल का? नंतर दलित मुलांनी सवर्ण महिलेच्या हातचे खाणार नाही असे प्रत्युत्तर दिले व नंतर सामंजस्याने हा विषय सुटला. महिनाभरापूर्वी अजून एका उच्च महाविद्यालयात हिजाबचा वाद सामंजस्याने सुटला होता. हा देखील स्थानिक पातळीवर सोडवायला हवा होता, परंतु फुटीरवादी राजकारणातून पराभवाचा वचपा काढण्याचा यात प्रयत्न दिसतो. एकसारखे भगवे फेटे आणि उपरणे घालून येणाऱ्या मुलांना एका पेटीतून ते कसे दिले गेले आणि परतही कसे घेतले गेले याचा व्हिडियो आला आहे. तसेच मुस्कान या हिजाबधारी मुस्लीम मुलीने जय श्रीरामाच्या घोषणा देत उचकवणाऱ्या तरुणांना अल्ला हु अकबर म्हणून उत्तर देत न घाबरता वर्गाकडे गेली याचाही व्हिडियो कौतुकास्पद ठरत आहे. शिक्षणासाठी मुस्लिम मुलींना घरातील धार्मिक निर्बंधांपासून प्रत्यक्ष वर्गापर्यंत अनेक पातळीवर भेदभाव, दमन यांचा सामना करत वाट काढावी लागत आहे. त्यात अशा फुटीरवादी राजकारणाने अजून मोठे अडथळे उभे राहात आहेत. शिक्षणाचे क्षेत्र पवित्र ठेवायचे असेल तर त्यात शिरलेल्या धर्मांध शक्तींना दूर करावे लागेल. परंतु आजच्या राजकारणात तेच पात्रतेचे निकष ठरत असताना हे आव्हान मोठे आहे.

# अलिबागचा खारेपाट ही नररत्नांची खाण

बळवंत वालेकर

अलिबाग तालुक्यातील सांबरी ते रेवस ही ८४ गावे खारेपाट विभागात मोडतात. येथे शेती हा मुख्य व्यवसाय असून काहींचा मच्छी पकडणे हा दुय्यम व्यवसाय आहे. येथे आगरी जातीचे प्राबल्य असुन कोळी, माळी, गौळी, भंडारी, ब्राह्मण मारवाडी, गुजराथी, नवबौद्ध तसेच आदिवासी देखील आहेत. ५० वर्षांपूर्वी येथे गोड्या पाण्याची व दळणवळणाची सुविधा नव्हती. आरोग्य सुविधा तर कोसो दूर होती. पण येथील भूमीपुत्र बेडर आहे. अन्यायाची त्याला चीड आहे. मोडेन पण वाकणार नाही ही प्रव्रुत्ती.आहे. तो तिखट स्वभावाचा आहे. पण भजन-कीर्तनात रमणारा आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, व आध्यात्मिकतेची मुळात आवड आहे. येथील भूमिपुत्रांना शिक्षणाची मुळात आवड असल्यामुळे पारतंत्र्य काळात गावागावात शाळा काढल्या. त्यात मुलींच्या शिक्षणास प्राधान्य दिले. म्हणून शहाबाज येथे पारतंत्र्य काळात १८६५ साली मुलांची तर १९१३ साली मुलींची प्राथमिक शाळा सुरु केली. गावोगावी शाळा असल्यामुळे अनेक नररत्ने उदयास आली. त्यांनी खारेपाटाचे नाव महाराष्ट्र भर, भारतभर तर काहींनी सातासमुद्रा पलिकडे नेले..

५० वर्षापूर्वी दळणवळणाची सोय नसलेला, गोड्या पाण्याची सुविधा नसलेला, शेताच्या बांधावरील चिखलातील पाऊलवाट हीच वहिवाट असलेला, ५/७ किलोमीटर दूर अंतरावरून डोक्यावरून पाणी वाहून आणणारा येथील भूमीपुत्र शिक्षण व राजकीय दृष्ट्या विशेष जागृत होता व



आहे. धेरंड (शहापूर) या बेटवजा गावात १४० वर्षापूर्वी नारायण नागू पाटील हे नररत्न जन्मले. तल्लख बुद्धी व अगाध स्मरणशक्ती असल्यामुळे अनंत समस्यांना तोंड देत शिष्यवृत्तीधारक बनले. शिवाय मॅट्रिक परीक्षेत प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले. सावकारांकडून शेतकरी वर्गावर होणारा, अन्याय दूर होण्यासाठी कोकण कृषीवल हे साप्ताहिक (१९३७ साली ) सुरू केले. तेच आजचे दै. कृषीवल होय. सावकारशाही नष्ट होण्यासाठी चरी संप घडविला. पारतंत्र्य काळात आमदारकी भूषवित असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मुंबई विधीमंडळ गाजविले. शे.का.पक्ष कुलाबा जिल्ह्यात मजबूत करताना जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्षपदही भूषविले.

महात्मा गांधीजींची स्वातंत्र्य चळवळ तळागाळात रुजण्यासाठी या भागातील पहिले वकील लक्ष्मणराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली खारेपाटातील तरूण वर्ग जागा झाला. ब्रिटिशांना त्रास देण्यासाठी टेलिफोनच्या तारा तोडीत. कायदाभंग करण्यासाठी तिनविरा येथे जंगल सत्याग्रह केला. लक्ष्मणरावांनी पारतंत्र्यकाळात आमदारकीही गाजविली. स्वातंत्र्य चळवळीत दामोदर नारायण (दामू अण्णा) पाटील (वाघ्रण), गजानन नारायण पाटील (रांजणखार), नथुराम पोशा पाटील (हाशिवरे) इ. सहकाऱ्यांचा सहभाग होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दत्ता पाटील (शे.का.प.) १९५७ साली आमदार झाले. ते २७ वर्षे आमदार होते. विरोधी पक्ष नेतेपदही त्यांनी भूषाविले. मीनाक्षी पाटील (शे. का. प) आमदार होऊन राज्यमंत्रीपदही त्यांनी भूषविले. आता शे.का.प. सरचिटणीस जयंत पाटील आमदारकी भूषवित असून त्यांचे बंधू पंडित पाटील हे सुद्धा आमदार होते. हाशिवरे येथील सुविद्य महिला चंपूताई मोकल काँग्रेसतर्फे ठाणे शहरातून आमदार झाल्या तर डॉ. चंद्रकांत मोकल दापोली येथून काँग्रेसचे आमदार झाले. शहापूर येथील डॉ. काका पाटील यांना शे.का.प.तर्फे आमदारकीची संधी मिळाली.

### लोकाभिमुख प्रतिनिधित्व

खारेपाट विभागातर्फे ना. ना. पाटील कुलाबा जिल्हा लोकल बोर्डावर निवडून गेले व अध्यक्षपदही भूषविले. डॉ. काका पाटील (शहापूर) व शांताबाई मोकल (हाशिवरे) यांनीही जिल्हा लोकल बोर्डाचे प्रतिनिधित्व केले.

१९६२ साली जिल्हा लोकल बोर्ड इतिहासजमा होऊन जिल्हा परिषद अस्तित्वात आली. हरी रामा माळी (शहाबाज) यांनी शे. का.प. तर्फे तर मणीभाई मेहता (सारळ) यांनी काँग्रेसतर्फे कुलाबा जिल्हा परिषदेचे प्रथम प्रतिनिधित्व केले. त्यानंतर दामूअण्णा पाटील (काँग्रेस), शं.ना.मोकल (काँग्रेस), प्रभाकर पाटील, मीनाक्षी पाटील, जयंत पाटील, पंडित पाटील, सौ. सुप्रिया पाटील, सौ. चित्रा पाटील, जगन्नाथ पाटील, ॲड. आस्वाद पाटील, सौ. भावना पाटील (सर्व शे.का.प.) तसेच प्रकाश धुमाळ (काँग्रेस) यांनी जिल्हा परिषदेत प्रतिनिधीत्व केले. पैकी प्रभाकर पाटील (११ वर्षे), सौ. सुप्रिया पाटील, पंडित पाटील यांनी जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद तर प्रकाश धुमाळ व ॲड. आस्वाद पाटील यांनी उपाध्यक्षपद भूषविले.

### बेडरवृत्तीचा भूमीपुत्र

शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात खारेपाट अग्रेसर आहे. पारतंत्र्य काळापासून येथे गाव तेथे शाळा हे धोरण अवलंबिले गेल्यामुळे सर्वत्र शिक्षणाचा प्रसार झाला. संपूर्ण कुलाबा (विद्यमान रायगड) जिल्ह्यास शिक्षक पुरविणाऱ्या शहाबाज येथे १५५ वर्षांपूर्वी (१८६५ साली) प्राथमिक शाळा तर १९१३ साली मुलींची शाळा चालू झाली. या शैक्षणिक प्रगतीमुळे अनेक तरुण उच्च विद्याविभूषित झाले व उच्चपदी पोचले. सुप्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक डॉ. एम.एस.मधुकर सुदाम पाटील (शहाबाज) यांनी मालेगाव (जिल्हा नाशिक) येथील महाविद्यालयाचे प्राचार्यपद भूषविले. खिडकी या छोटेखानी गावात अनेक तरुण पदवीधर व द्विपदवीधारक आहेत. प्रा. एम.पी. (मधुकर पोसू) पाटील यांनी पालघर येथील महाविद्यालयाचे प्राचार्यपद तर मराठी भाषेचे थोर समीक्षक प्रा.गंगाधर पाटील यांनी मुंबई येथील के. सी. कॉलेजच्या मराठी विभागाचे प्रमुखपद सांभाळले. सातघर येथील सदाशिव नथोबा आठावले यांनी कुर्डूवाडी (जि. अहमदनगर) येथील महाविद्यालयाचे प्राचार्यपद भूषविले. ते इतिहासाचे गाढे अभ्यासक असल्यामुळे जगातील अनेक महाविद्यालयाकडून व्याख्यानासाठी निमंत्रणे येत असत. जागतिक कीर्तीचे तत्वज्ञ व क्रांतिकारक न्यायरत्न धुंडिराज गोविंद विनोद हे केतकीचा मळा या गावचे सुपुत्र. १९५४ साली जपान येथे भरलेल्या विश्वशांती परिषदेचे ते सचिव होते. त्यांना कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टरेट दिली होती. कुसुंबळे येथील अनिल कमलाकर पाटील अलिबाग येथील जे. एस.एम.महाविद्यालयाचे माजी, विद्यार्थी व विद्यमान प्राचार्य आहेत. तसेच अनेक क्षेत्राला उच्च विद्याविभूषित तरुण कार्यरत आहेत. शीघ्र कवि व लावणीकार राघोबादादा कोपरकर हे कोपरचे. कोकण कृषीवल साप्ताहिकाचे पहिले संपादक नथुराम रामचंद्र थळे हे सुद्धा कोपरचे. सुप्रसिद्ध लेखक कवि व चित्रकार शंकर सखाराम आणि संगीतकार अच्युत ठाकूर हे सुद्धा कोपरचेच. लोकप्रिय संगीतकार व नेपथ्यकार शांता राम बुवा पाटील वाघ्रणचे. शहाबाज येथील प्रभाकर गंगाराम पाटील संपादित कुलाबा मानस हे खारेपाटातील दुसरे साप्ताहिक. कालांतराने ते बंद पडले. बळवंत वालेकर (वाघोली) संपादित कुलाबा वैभव हे खारेपाटातील तिसरे साप्ताहिक, ते २७ वर्षे चालू असून त्यांच्या सामाजिक कामाचा विचार करून त्यांना जिल्हा परिषदेने रायगड भूषण पुरस्कार देऊन गौरविले आहे. रायगडचा युवक व कोकणनामा ही साप्ताहिकेही याच भागातील. कवि, लेखक व नाटककार भ.ल.पाटील लोणघरचे सुपुत्र. कूळकायदा, चौथेरत्नही नाटके विशेष गाजली. साहित्यिक व पत्रकार म.ना. पाटील पेझारीचे. आदर्श शिक्षक म्हणून राज्य पुरस्काराने ते सन्मानित झाले होते. मुंबई महापालिकेने महापौर पदक देऊन गौरविलेले ब.गि. पाटील सुतारपाडा गावचे, आदर्श शिक्षक म्हणून राष्ट्रपतीपदक विजेचे ब.रा. वाघपंजे वाघोलीचे सुपुत्र. ब्रिटिश काळात न्यायदानात मदत करण्यासाठी ज्यूररचे काम करणारे मैनुद्दीन छापेकर (मैनूशेट याच भागातील). हिंदू व मुस्लिम समाजात त्यांना प्रतिष्ठा होती. ब्रिटिश काळातील खारेपाटातील पहिले डॉ. वसंत रेगे पोयनाडचे. मुंबई येथील पोर्ट ट्रस्टचे निवृत्त अधिकारी गोवर्धनशेट मोकल यांनी हाशिवरे परिसरातील शेकडो तरुणांना नोकऱ्या दिल्यामुळे या परिसराचा कायापालट झाल्याचे जाणवते. चरी येथील निवृत्त शिक्षक रामभाऊ कामत यांची मुले विक्रमवीर ठरली. डॉ सुधाकर कामत* - Chest specialist in K. E. M. Hospital डॉ. मुरलीधर कामत (कॅन्सर रोगतज्ज्ञ) ग. रा. कामत प्रा. रुईया महाविद्यालय व पटकथा लेखक आणि साहित्यिक तसेच प्रा. उमाकांत कामत. मराठी विभाग प्रमुख पालघर महाविद्यालय. खारेपाट विभागात अशीच नररत्ने जन्मास यावीत व या विभागाचे नाव सातासमुद्रा पलिकडे पोचावे हीच सदिच्छा.

## वारं-वारं

अतुल गुळवणी

# चकाचक अलिबाग

रायगडची राजधानी म्हणून अलिबागकडे मोठ्या अभिमानाने पाहिले जाते. या नगरीला ऐतिहासिक महत्व असल्याने पर्यटनाच्या निमित्ताने या शहर आणि परिसराला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगारही उपलब्ध होत आहेत. छोटे, मोठे व्यावसायिकही या पर्यटनातून अर्थार्जन करीत असल्याने पर्यटनाच्या माध्यमातून अलिबागचा विकास करणे शक्य होत आहे. यासाठी अलिबाग नगरपालिका नेहमीच तत्पर राहिलेली आहे. आ. जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वाखाली अलिबाग शहराचा विविध माध्यमातून सर्वांगिण विकास सुरु आहे. विकासासाठी विविध माध्यमातून राज्य शासनाकडून निधी उपलब्ध केला जात असून, त्या निधीचा योग्य प्रकारे विनियोग केला जात आहे. शहरातील रस्ते हे दळणवळणाचे मुख्य साधन असल्याने अलिबाग पालिकेच्यावतीने शहरातील सर्वच रस्त्यांचे डांबरीकरण वेळोवेळी दर्जेदार पद्धतीने करण्यात आलेले आहे. रस्ते चांगले असल्याने नागरिकांसह अलिबागला भेट देणारे पर्यटकही पालिकेच्या कारभाराबद्दल समाधान व्यक्त करीत आहेत. कारण रस्ते चांगले असल्याने शहरातून प्रवास करणे सुलभ होत आहे. शिवाय अनेक ठिकाणी आवश्यकतेनुसार रस्त्यांचे रुंदीकरणही करण्यात आलेले आहे. त्यामुळे नेहमी वाहतूक कोंडीने गजबजून जाणाऱ्या रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. रायगड जिल्ह्यातील अन्य नगरपालिकांच्या कारभाराकडे जरा डोळसपणे पाहिले तर निश्चितच अलिबाग पालिका या सर्वांमध्ये निश्चितच प्रभावीपणे काम करताना दिसते. शहरवासियांना मुलभूत सुविधा पुरविणे हे पालिकेतील कारभाऱ्यांचे मुख्य कर्तव्य आहे. त्या कर्तव्याची जाणिव ठेऊनच प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वाखालील अलिबाग पालिकेतील शेकापची टीम निश्चितच चांगले काम करीत आहे. हे त्यांच्या कृतीतून दिसून आल्याशिवाय राहणार नाही. या टीमने विकासाचा स्त्रोत असाच सुरु ठेवावा, ही सदिच्छा.

# शेकापची बांधिलकी

जनसेवा हीच समाजसेवा हे ब्रीद उराशी बाळगून आणि ८० टक्के समाजकारण, २० टक्के राजकारण हे धोरण ठेऊन रायगडच्या राजकीय, सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या शेतकरी कामगार पक्षाने नेहमीच सामाजिक जाणिवेचे भान ठेवत सर्वसामान्यांशी असलेली आपली बांधिलकी जोपासली आहे.नाना पाटील यांचा हा वारसा दादा, भाऊ यांच्या पिढीने समर्थपणे सांभाळला. त्या मार्गावरुनच आ. जयंत पाटील, मीनाक्षी पाटील, पंडित पाटील यांनी वाटचाल केली आता त्याच मार्गावरुन शेकापची पुढील पिढीही वाटचाल करताना दिसत आहे. शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनीही याच मार्गाने वाटचाल सुरु केलेली आहे. कोरोना साथीत अन्नधान्य पुरविण्यापासून धान्य वाटपही करण्यात त्यांनी पुढाकार घेतला आहे. शिवाय निसर्ग चक्रीवादळात उद्ध्वस्थ झालेल्या कुटुंबाना आधार दिला आहे. याशिवाय लॉकडाऊन काळात छोट्या विविध व्यावसायिकांना जीवनाश्यक वस्तुंचे वाटप केले आहे. जिल्हा रुग्णालयासाठी आयसीयु कक्षाची उभारणी केली आहे. लसीकरण अभियानातही मोफत लसीकरण मोहीम यशस्वीपणे राबवून आम्ही तुमच्या सोबत आहोत हे कृतीतून दाखवून दिलेले आहे. आता सरकारच्यावतीने बुस्टर डोस मोहीम सुरु करण्यात आलेली आहे. यासाठीही शेकापने पुढाकार घेतला आहे. बुस्टर डोस घेणाऱ्या प्रत्येकाला एक महिन्याचे मोफत धान्य देण्याची योजना सुरु करण्यात आलेली आहे. जेणेकरुन नागरिकांना बुस्टर डोस घेणे शक्य होणार आहे. संकटसमयी जो मदत करत त्याच्या मागे जनता नेहमी सदैव पाठिशी असते हे अनेकदा कृतीतून दिसून आलेले आहे. याचे प्रत्यंतर शेकापला वारंवार आलेले आहे. केवळ घोषणाबाजी करणे हे शेकापच्या रक्तात नाही तर सर्वसामान्यांसाठी कुठलीही मोहीम यशस्वीपणे राबवून त्या योजनेचा तळागाळातील जनतेला लाभ मिळवून देण्याचे काम शेकापने केलेले आहे. यापुढेही सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम सुरुच राहणार आहे हे निश्चित.



## भगवद्गीता

तसेच ज्या व्यक्ती भगवंतांच्या अस्तित्वाबद्दलच द्वेष करतात त्यांनाही गीतेमधील रहस्याला स्पर्शही करणे शक्य नाही, म्हणून गीतेवरील मायावादी टीका ही परम सत्याबद्दल अत्यंत दिशाभूल करणारी आहे. श्री चैतन्य महाप्रभूंची मायावादी भाष्य वाचण्यास मनाई केली आहे आणि असेही सूचित आहे की, जो अशा मायावादी तत्वज्ञानाचा स्वीकार करतो तो गीतेतील वास्तविक रहस्य जाणण्यास असमर्थ ठरतो. जर स्वतंत्र व्यक्तित्व भौतिक सृष्टीशी संबंधित असते तर भगवंतांनी गीतोपदेश करण्याची काहीच आवश्यकता नव्हती. स्वतंत्र जीव आणि भगवंत यांचे अनेकत्व ही वास्तविकता आहे आणि वर सांगितल्याप्रमाणे वेदांमध्ये याची पुष्टी करण्यात आली आहे.

**देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।**
**तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ।।१३।।**

देहिनः- देहधारी आत्म्याला; अस्मिन्- यात; यथा- ज्याप्रमाणे; देहे- शरीरामध्ये; कौमारम्- बालपण; यौवनम्- तारुण्य; जरा- वार्धक्य, म्हातारपण; तथा- त्याप्रमाणे; देह-अन्तर- शरीराचे स्थानांतर; प्राप्तिः- प्राप्ती; धीरः- धीर मनुष्य; तत्र-त्यामुळे; न- कधीच नाही; मुह्यति- मोहित होतो.

ज्याप्रमाणे देहधारी आत्मा अविरतपणे या देहात, बालपणापासून तारुण्यात आणि तारुण्यातून म्हातारपणात जात असतो, त्याचप्रमाणे मृत्यूनंतर जीवात्मा दुसऱ्या देहामध्ये प्रवेश करतो. अशा स्थित्यंतरांमुळे धीर मनुष्य गोंधळून जात नाही.

तात्पर्य : प्रत्येक जीव हा स्वतंत्र देहधारी आत्मा असल्यामुळे तो प्रत्येकक्षणी आपले शरीर बदलत असतो. या बदलामुळे तो कधी बालकाप्रमाणे, कधी तरुणाप्रमाणे तर कधी म्हाताऱ्याप्रमाणे दिसून येतो. असे असले तरी तोच जीवात्मा तेथे असतो आणि त्याच्यामध्ये कोणताही बदल घडून येत नाही. अंततः हा जीवात्मा मृत्यूनंतर शरीर बदलतो आणि दुसऱ्या शरीरात स्थानांतरित होतो. जीवात्म्याला पुढच्या जन्मामध्ये आध्यात्मिक किंवा भौतिक शरीर मिळणार हे निश्चित आहे आणि यासाठीच भीष्म, द्रोण यांच्याबद्दल अतिशय आस्था असणाऱ्या अर्जुनाला त्यांच्या मृत्यूमूळे शोकाकूल होण्याचे काहीच कारण नव्हते. उलट ते वृद्ध शरीरातून नवीन शरीरात स्थानांतर करुन नवतारुण्य प्राप्त करीत असल्यामुळे अर्जुनाने आनंदित व्हावयाला हवे होते. शरीरातील अशा बदलांमुळे एखाद्याला त्याच्या आयुष्यातील कर्मानुसार सुख किंवा दुःख प्राप्त होते. म्हणून भीष्म व द्रोण थोर व्यक्ती असल्यामुळे त्यांना नक्कीच पुढील जन्मी आध्यात्मिक देहाची प्राप्ती होणार होती किंवा निदान भौतिक जगतातील श्रेष्ठ प्रतीचा उपभोग घेण्यासाठी स्वर्गलोकांची तरी प्राप्ती होणारच होती. याप्रमाणे कोणत्याही बाबतीत शोक करण्याचे कारणच नव्हते.

ज्या मनुष्याला जीवाची मूळ स्थिती, परमात्मा आणि आध्यात्मिक तसेच भौतिक प्रकृतीचेही परिपूर्ण ज्ञान असते त्या मुष्याला 'धीर' किंवा ज्ञानी मनुष्य असे म्हणतात. असा मनुष्य शरीराच्या स्थित्यंतरामुळे कधीच गोंधळून जात नाही.

जीवात्म्याचा एकात्मवाद हा मायावादी सिद्धांत मान्य करता येत नाही कारण जीवात्म्याचे तुकडे करता येत नाहीत. अशा प्रकारे जीवात्म्याचे विभाजन झाले असते तर परमात्माही विभाजनीय झाला असता, पण यामुळे परमात्मा हा अपरिवर्तनीय आहे. या सिद्धांताचे उल्लंघन झाले असते. परंतु गीतेमध्ये निश्चितपणे सांगितल्याप्रमआणे परमात्म्याचे अंश नित्य अस्तित्वात असतात (सनातन) आणि त्यांना 'क्षर' म्हटले जाते. कारण त्यांच्यामध्ये भौतिक प्रकृतीत पतन होण्याची प्रवृत्ती असते. हे अंशात्मक जीव नित्य अंशात्मकच राहतात, आणि मुक्तीनंतरही ते अंशच राहतात, पण मोक्षप्राप्तीनंतर जीवात्मा हा भगवंताबरोबर ज्ञान आणि आनंदमयी असे शाश्वत जीवन जगतो. प्रत्येक व्यक्तिगत शरीरात स्थित असलेल्या परमात्म्याला प्रतिबिंबाचा सिद्धांत लागू करता येतो. तो जीवात्म्याहून भिन्न असतो. आकाशाच्या पाण्यातील पडलेल्या प्रतिबिंबामध्ये सूर्य, चंद्र आणि तारे दिसून येतात. तारकांची तुलना जीवात्म्यांशी करता येते तर चंद्र किंवा सूर्याची तुलना परमेश्वराशी करता येते.

(क्रमशः)

(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)

# भारत जपान मैत्रीची सत्तर वर्ष

श्याम ठाणेदार

भारत आणि जपान हे एकमेकांचे विश्वासू मित्र आहेत. जगातील भारताचे जे विश्वासू मित्र आहेत त्यात जपानचा क्रमांक खूप वरचा आहे. दोन्ही देशांच्या मैत्री संबंधाला यावर्षी सत्तर वर्ष पूर्ण झाली आहेत. २०२२ हे वर्ष तसे ऐतिहासिक आहे कारण हे वर्ष भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष आहे तर जपान आणि भारत मैत्री संबंधाला यावर्षी सत्तर वर्ष पूर्ण होत आहे. १९४७ साली भारत स्वातंत्र्य झाल्यावर ज्या मोजक्या देशांनी भारताशी मैत्रीचे संबंध स्थापन केले होते त्यात जपान हा ही एक देश होता. भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु आणि जपानचे तत्कालीन पंतप्रधान शिगेरु येशूदा यांच्यापासून सुरू झालेली ही मैत्री भारताचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे विद्यमान पंतप्रधान फुमिओ केशिदा यांच्यापर्यंत चालू आहेत. जपान हा आज भारताचा विश्वासू मित्र असला तरी दोन्ही देशांच्या मैत्री संबंधात अनेकदा चढउतार पाहायला मिळाले आहेत. विशेषतः अटलबिहारी वाजपेयी हे भारताचे पंतप्रधान असताना दोन्ही देशांचे संबंध बिघडले होते त्याला कारणही तसे होते. १९९८ साली अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना भारताने पोखरणमध्ये अणूचाचण्या केल्या होत्या. तेव्हा भारताला सर्वात जास्त जपानच्या रोषाला सामोरे जावे लागले होते. जपानने भारताविरोधी आघाडी उघडून मोठ्या प्रमाणात विरोध करण्यास सुरुवात केली होती. जपान हा अण्वस्त्रांबाबत सर्वात संवेदनशील देश आहे. कारण आजवर एकाच देशावर अण्वस्त्र हल्ला झाला आहे आणि तो देश म्हणजे जपान. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा



आणि नागासाकी या दोन शहरांवर अण्वस्त्र हल्ला करून हे दोन्ही शहरे बेचिराख केली होती. अण्वस्त्रांची सर्वात जास्त झळ जपानला बसली आहे. त्यामुळे १९९८ साली जेव्हा भारताने अण्वस्त्र चाचण्या केल्या तेव्हा जपानने भारतावर निर्बंध लादले होते. अर्थात हे निर्बंध जास्त दिवस चालले नाही कारण भारताची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात प्रगती करत होती व चीन विरोधात आघाडी उघडण्यासाठी जपान व अमेरिकेला भारताची गरज होती. त्यामुळे भारत आणि जपान यांचे संबंध लवकरच पुर्ववत झाले. २००४ साली जेंव्हा मनमोहन सिंग यांचे सरकार अस्तित्वात आले तेंव्हापासून दोन्ही देशांतील संबंध आणखी दृढ झाले. वर्ष २००६ पासून जपान व भारत यांच्यात वार्षिक बैठका (ही बैठक एक वर्ष भारतात तर एक वर्ष जपानमध्ये अशी असते) सुरू झाल्या. २००६ साली सुरू झालेल्या या वार्षिक बैठका आजतागायत चालू आहेत. या बैठकांमुळे अनेक चांगल्या गोष्टी घडल्या आहेत. जसे २०१३ साली जपानचे पंतप्रधान शिंजो आबे भारताच्या दौऱ्यावर आले होते तेंव्हा भारतातील अतिवेगवान रेल्वे (बुलेट ट्रेन) ची घोषणा करण्यात आली. नरेंद्र मोदी भारताचे पंतप्रधान बनल्यावर बुलेट ट्रेन प्रकल्पाला चालना मिळाली. बुलेट ट्रेनसाठी दोन्ही देशात करार झाला. भारतातील बुलेट ट्रेनसाठी जपान सर्वतोपरी मदत करणार असून हा प्रकल्प पूर्णत्वास जाण्यासाठी जपानने भारताला मोठे अर्थसहाय्य केले आहे. जपानच्या मदतीने भारतातील बुलेट ट्रेनचे काम प्रगतीपथावर आहे. भारतातील ईशान्येकडील राज्यांमध्ये विकासासाठी जपान प्रयत्नशील आहे. जपान हा भारताचा सर्वात मोठा देणगीदार असून भारतातील सर्वात मोठी तिसरी थेट परकीय गुंतवणूक ही जपानकडून होते. दोन्ही देश एकमेकांना विज्ञान अंतराळात प्रगती करण्यासाठी सहकार्य करतात. भारत आणि जपान मैत्री संबंधाला आणखी किनार आहे ती म्हणजे चीन. जागतिक मागासत्ता होण्याचे चीनचे स्वप्न आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी तो आशिया खंडावर एकहाती वर्चस्व गाजवू इच्छितो मात्र त्याची ही इच्छा भारत आणि जपानमुळे पूर्ण होऊ शकत नाही. भारताप्रमाणेच जपानलाही चीन पाण्यात पाहतो. जपानही चीनचे वर्षस्व झुगारून देतो. चीन हा जपान आणि भारत या दोन्ही देशांचा समान शत्रू आहे. चीनशी लढायचे असेल तर जपान आणि भारत या दोन्ही देशांना हातात हात धरून काम करावे लागेल. दोन्ही देशांच्या क्षमता व त्रुटी पूरक आहेत. दोन्ही देशांचे मैत्री संबंध दृढ झाले तरच दोघांचा विकास होऊ शकतो आणि चीनलाही टक्कर देता येऊ शकेल.

म ह त्त्वा चे

## समर्थ स्कूलमध्ये दीदींना श्रद्धांजली

**चिपळूण :** भारताच्या गानकोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांनी वयाच्या ९२ व्या वर्षी ६ फेब्रुवारी रोजी ब्रीच कॅण्डी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. भारतीय संगीत क्षेत्रातले एक महत्त्वाचे पर्व लतादीदींच्या निधनाने संपलेले आहे. श्री समर्थ कृपा इंग्लिश मीडियम स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय वेळ मध्ये भारतरत्न लता मंगेशकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सदर प्रसंगी संस्थाध्यक्ष सुयश पाष्टे, प्रशालेचे प्राचार्य डॉ. एस एस. अली, शैक्षणिक समन्वयक डॉ.अजित भोसले तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## सिंधुदुर्गात बूस्टर डोस मोहिमेला वेग

**रत्नागिरी :** जिल्ह्यातील ९८ टक्के नागरिकांनी कोरोना प्रतिबंधक लसीचा पहिला डोस घेतला. बूस्टर डोस देण्याची मोहिमही वेगात सुरू आहे, अशी माहिती आज जिल्हा परिषदेच्या आरोग्य समिती सभेत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलिपे यांनी दिली. जिल्हा परिषद आरोग्य समितीची सभा सभापती डॉ. अनिशा दळवी यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात झाली. यावेळी समिती सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलीपे, समिती सदस्य लॉरेन्स मान्येकर, प्रितेश राऊळ, उन्नती धुरी, नूतन आईर, डॉ. संदेश कांबळे आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील ९८ टक्के नागरिकांनी कोरोना प्रतिबंधक लशीचा पहिला डोस घेतला आहे. ७८ टक्के नागरिकांनी दुसरा डोस घेतला असल्याची माहिती डॉ. खलिपे यांनी दिली.

## पाच पेट्रोल पंपांमध्ये मापात पाप

**रत्नागिरी :** रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाच पेट्रोल पंपांमध्ये मापात पाप केल्याबद्दल नोटीस बजावली आहे. प्रत्येक पाच लिटरमध्ये २५ मिली कमी पेट्रोल भरल्याने सहाय्यक नियंत्रण वैध मापन शास्त्र विभागाने ही कारवाई केली आहे. संबंधित पंप चालकांना त्यामध्ये सुधारणा करून आपला परवाना नूतनीकरण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या विभागाच्या मुख्यालयातील पथकाने केलेल्या तपासणीत हे पुढे आले आहे.

# पूररेषांमुळे चिपळूणचे दोन भाग

*। चिपळूण । वृत्तसंस्था ।*

*शहर परिसरातील पूररेषा निश्चित करणाऱ्या शासनाकडून निर्देशित केलेल्या लाल व निळ्या रेषेमुळे चिपळूण शहराचे दोन वर्ग झाले आहेत. एका वर्गात निषिद्ध क्षेत्र, तर दुसऱ्या वर्गाला नियंत्रित क्षेत्र संबोधले गेले आहे. निषिद्ध क्षेत्रामध्ये नदीच्या डाव्या व उजव्या तीरानजीकची निळी पूररेषा तर नियंत्रित क्षेत्रामध्ये दोन्ही तीरावरील निळ्या रेषेपासून त्याच ठिकाणी असलेली लाल रेषा यामधील क्षेत्राला नियंत्रित क्षेत्रात सामावण्यात आले आहे. या रेषांमुळे नव्या बांधकामांना अडचणी तर जुन्या बांधकामांच्या पुनर्बांधणीला अडचणी नसल्याचे सांगितले जाते. मात्र, या रेषांमुळे चिपळूणचा मोठा नागरी वस्तीचा भाग बाधित झाल्याने या रेषा रद्द करण्याची मागणी होत आहे.*





### निळी पूररेषा

*निळ्या पूररेषेमध्ये शहरातील गोवळकोट परिसरातील काही भाग, पेठमाप परिसरातील तांबटआळी, परीटआळी, गोवळकोट रोड, मुरादपूर, मुरादपूर मोहल्ला, वडार कॉलनी, शंकरवाडी, वाणीआळी, बापट आळी, बेंदरकरआळी, भोगाळे परिसर, बाजारपेठ, मार्कंडी व काविळतळी, पागमळा काही भाग, महालक्ष्मीनगर आदींचा समावेश आहे.*

### लाल रेषा

*लाल रेषेबाहेरील क्षेत्रामध्ये राधाकृष्णनगर, ओऑसिस हॉटेलच्या मागील भाग, रावतळे, मतेवाडी, डीबीजे महाविद्यालय परिसर, इंडियन ऑईल पेट्रोल पंप ते हॉटेल हायवे (ऑक्ट्रॉय नाक्याकडे जाताना महामार्गावरील डावीकडील भाग) हायवे हॉटेल ते एसएमएस हॉस्पिटलपर्यंत वरील बाजूस (पागझरीकडील) परिसर, पॉवर हाऊस, पाग, डॉमिनोजची वरील बाजू (पाग भागाकडे), देसाई बाजारचा वरील भाग (पाग भागाकडे), खेड, गुहागर बायपास भागातील डोंगराळ भाग तसेच गोवळकोट किल्ल्याजवळील डोंगराळ भाग आदींचा समावेश आहे.*

याबाबत चिपळूण पालिकेने नागरिकांसाठी दिलेल्या जाहीर सूचनेनुसार शहरातील वाशिष्ठी व शिव नदीच्या तिरावर निळी व लाल रेषेचे मार्किंग केलेले नकाशे जलसंपदा विभागास प्राप्त झाले आहेत. निळी रेषेअंतर्गत सरासरीनुसार २५ वर्षांतून एकदा अथवा वारंवार येणारा पूर, त्यामध्ये बाधित होणारे क्षेत्र दर्शविण्यात आले आहे. लाल रेषेमध्ये सरासरीने शंभर वर्षातून एकदा पूर दर्शविण्यात आला आहे. निषिद्ध क्षेत्रातील कोणत्याही नव्या बांधकामांना परवानगी मिळणार नाही. मात्र, जुन्या अथवा पुनर्बांधणी बांधकामांना परवानगी दिली जाणार आहे. नियंत्रित क्षेत्रामध्ये लाल व निळ्या रेषा या भागांच्या दरम्यान नवीन बांधकाम करताना इमारतीचा तळमजला, जोत्याची पातळी लाल पूररेषा पातळीवर प्रस्तावित बांधकाम हे मुद्दे विचारात घेतले जाणार आहेत.

सर्वसाधारणपणे निळी पूररेषा ही महामार्गाला समांतर आहे. लाल व निळी पूररेषा शहराच्या विकासाला मोठी अडचणीची ठरणार असून दोन्ही रेषांतर्गत नव्या बांधकामांना परवानगी मिळणार नाही. रेषांतर्गत नागरी वस्तीमधील पुनर्बांधणीकामांना परवानगी मिळणार आहे. याबाबत नागरिकांसह तज्ज्ञांसोबत पाहणी व चर्चा करून तसेच आवश्यक ते उपाय, नियोजन करून निर्णय घेण्याची मागणी केली जात आहे.

## चिपळूण बचाव समितीचा सत्कार



**। चिपळूण । वार्ताहर ।**

शहरातील खेड चौकी येथील इच्छापूर्ती गणेश मंदिर समितीतर्फे चिपळूण बचाव समितीचा सत्कार माघी गणेशोत्सव कार्यक्रमात करण्यात आला. चिपळूण मधील गाळ काढण्यासाठी ऐतिहासिक आंदोलन करून यश मिळविल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. बचाव समितीचे किशोर रेडीज, शिरीष काटकर, अरुण भोजने, समीर जानवलकर, उदय ओतारी आदीचे कौतुक करण्यात आले. यावेळी मंदिर समितीचे दादा खातू, जगदीश साडविलकर, अध्यक्ष शैलेश जागुष्टे, उपाध्यक्ष गणेश दळी, आबा जागुष्टे, मनोज दळी, लवेश म्हापुसकर, मनोज खातू आदी उपस्थित होते.

## श्री समर्थ कृपा विद्यालयाचे मोफत करिअर मार्गदर्शन संपन्न

**। चिपळूण । वार्ताहर ।**

खेड तालुक्यातील वेरळ येथील श्री समर्थ कृपा विश्व प्रतिष्ठान संचलित श्री समर्थ कृपा इन्स्टिट्यूट वेरळच्यावतीने चिपळूण येथील रामतीर्थ तलावाजवळील स्टुडंट ट्युटोरियल येथे मोफत करिअर मार्गदर्शन झाले. सदर कार्यक्रमास चिपळूण तालुक्यातील विद्यार्थी, पालक यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या शिबिरात शिक्षण तज्ज्ञांकडून पाल्य व त्यांच्या पालकांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक माधव अंकलगे व डॉ. सतीश जाधव या शिक्षणतज्ज्ञांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे विनोद कुमार सिंग यांनी इयत्ता दहावी नंतर काय? यासंबंधी विविध पैलूंबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थी पालक व तज्ज्ञ मार्गदर्शक यांच्यामध्ये संवाद साधण्यात आला. यामध्ये विद्यार्थी व पालक यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी सुयश पाष्टे, संजना पाष्टे, स्वाती कान्हेकर, विजय तिवारी, महेंद्र कासेकर, डॉ.एस.एस. अली, अजित भोसले, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिर्के एस. एस. व आभार प्रदर्शन भोसले के. एस. यांनी केले.




## चिपळूण शहरातील लोकवस्तीत मगरीचा वावर

**। चिपळूण । वार्ताहर ।**

शहर भागांतील लोकवस्तीच्या भागात खुप प्रमाणात मगरीचा वावर वाढत असून याआधी देखील स्थानिक नागरिकांनी वनअधिकारी व वनखात्याशी वारंवार संपर्क निवेदन देवून वनखात्याचे अधिकारी दुर्लक्ष करत असून या हिंस्र प्राण्याचा मानवी वस्तीमध्ये काही अनर्थ ओढवला जावू शकतो. अशी माहिती देताना याकडे वनविभागाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी वाणी आळी येथील युवा कार्यकर्ते सचिन शेट्ये यांनी केली आहे.

सध्या चिपळूण शहरातील गाळ काढण्याचे काम चालू असताना या प्राण्यांचा वावर आपल्या बचावकरिता आजूबाजूच्या परिसरातील शेतजमिनीमध्ये वाढला असून सदरच्या काही भागामध्ये दादर मोहल्ला, बेबल मोहल्ला, शिवनदी पुलाजवळील झोपडपट्टी व भोगाळे येथील श्री कलावती आई मंदीर परिसरात या मगरीचा वावर याआधीही राहिला आहे. तरी सदर वन खात्यातील अधिकारी वर्गाने याची दखल घेऊन यावर योग्य ती कार्यवाही करणे गरजेचे आहे.



## खेडमध्ये 'ई-टॉयलेट'चे राजकारण

**अजित जाधव**

**। खेड ।**

शहरातील जनतेसाठी सोयीचे ठरावे म्हणून हिराभाई बुटाला मंचच्या माध्यमातून काही कंपन्यांचा सीएसआर निधीतून ई टॉयलेट उभारण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. या टॉयलेटच्या पाठून आता राजकिय नाट्य पुन्हा एकदा रंगू लागले आहे. गेल्या दोन वर्षात विविध कंपन्यांचा सीएसआर निधी वापरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निकटवर्तीय कौस्तुभ बुटाला यांनी विविध कामे केली आहे. त्यापैकी बुटाला यांनी लाखो रुपये खर्च करून कोव्हिड केअर सेंटर धूळखात पडले आहे. या मंचच्या माध्यमातून ड्युरा सिलिंडर प्रणालीतील काही सिलिंडर गायब झाल्याची चर्चा आहे. या मंचाने सीएसआर निधीतून मोठ्या रक्कमा आणून शहरवासीयांसाठी खर्च केला आहे. तशाच काही दिवसांपूर्वी नगरपरिषदेकडे ई टॉयलेट बसविण्यासाठी प्रस्ताव सादर केला. सदर ई टॉयलेट स्व.मीनाताई ठाकरे सांस्कृतिक केंद्राच्या समोर मोकळ्या जागेत उभारण्याचा आग्रह मंचाचे सर्वेसर्वा बुटाला यांनी धरला आहे. सांस्कृतिक केंद्राच्या मोकळ्या जागेत बांधकामास सुरुवात केली होती. मात्र या बांधकामाला स्थानिक रहिवाशांनी विरोध केल्याने नगरपरिषदेने हे बांधकाम स्थगित केले. शहरात सध्या ई टॉयलेटचे राजकारण चर्चेचा विषय बनला आहे.



### ई टॉयलेट बसविण्यास विरोध नाही पण.... सतीश चिकणे

*शहरात सीएसआर निधीतून ई टॉयलेट उपलब्ध झाली आहेत, ही आनंदाची बाब आहे. मात्र ती स्व. मीनाताई ठाकरे सांस्कृतिक केंद्रासमोर बसविण्यास आमचा ठाम विरोध आहे. या केंद्रासोबत आमच्या भावना जोडल्या गेल्या आहेत. ई-टॉयलेट शहरातील अन्य गर्दीच्या ठिकाणी बसविता येणे शक्य आहे. मात्र आगामी निवडणूका तोंडावर असताना सीएसआर निधीच्या आडून कोण राजकारण करत असेल तर ते चालू देणार नाही. सांस्कृतिक केंद्राच्या समोर टॉयलेट बसवून संपूर्ण राज्यात चुकीचा संदेश दिला जाऊ शकतो व परिस्थिती बिघडू शकते त्यामुळे हा हट्ट सोडावा असा सल्ला माजी नगरसेवक सतीश चिकणे यांनी दिला आहे.*

## तुळसणीतील मुकादमच्या खुनातील नऊ जण निर्दोष

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

तुळसणी (ता. संगमेश्वर) येथील राजू मुकादम यांची गरम पाणी अंगावर ओतून हत्या केल्याच्या आरोपातून नऊ जणांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या जबाबातील विसंगती, संबंधित महिलेने अतिप्रसंगातून वाचण्यासाठी किंवा स्वसंरक्षणासाठी मुकादमच्या अंगावर पाणी ओतले, असा निष्कर्ष नोंदवून न्यायालयाने हा निकाल दिला.

सादीक हुसेन कापडी, मकसूद मुकादम, तन्वीर मुकादम, मुआज्जम रज्जाक मुकादम, जलाल बोट, आसरीन मुकादम, फियदोस कापडी, संदीप पवार, विकास पवार, अशी निर्दोष सुटलेल्या नऊ जणांची नावे आहेत. ही घटना २७ मार्च २०१८ ला घडली होती. अनैतिक संबंधाच्या संशयातून राजू मुकादम यांचा खून करण्यात आला, असा आरोप नऊ जणांवर ठेवण्यात आला होता.



२७ मार्चला राजू मुकादम दुचाकीवरून तुळसणी ते कातकरीवाडी रस्त्याने मुस्लिम मोहल्ला येथे घरी जात होता. या संधीचा फायदा घेऊन संशयितानी दुचाकी अडवून त्याच्या तोंडावर रुमाल बांधून संशयितांपैकी एकाच्या घरात घेऊन गेले होते. त्या ठिकाणी राजूचे हातपाय बांधून त्याला लाथा बुक्यांनी मारहाण करण्यात आली होती. त्यानंतर त्यांच्या अंगावर गरम पाणी ओतून त्याला गंभीर जखमी करण्यात आले. त्यानंतर उपचार दरम्यान त्याचा मृत्यू झाला, अशी तक्रार दाखल करण्यात आली होती. या खटल्यात दोन्ही बाजूचा युक्तीवाद पूर्ण झाला. खटल्यात चार वैद्यकीय अधिकाऱ्यांची साक्षही नोंदवण्यात आली होती.

## टीईटी परीक्षेत घोटाळ्याबाजांवर कारवाई

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

टीईटी परिक्षेत घोटाळा झाल्याची माहिती समोर आल्यानंतर संपूर्ण भरती प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पुणे पोलिसांनी याआधी परीक्षा परिषदेच्या अध्यक्षांपासून शिक्षण विभागातील काही जणांना ताब्यात घेतले आहे. आता यामध्ये आणखी महत्त्वाचा खुलासा झालाय. पुणे पोलिसांनी गतीने तपासाची चक्र फिरवत पैसे भरून शिक्षक झालेल्यांची यादी तयार केली आहे. त्यामुळे अशा ७,८०० बोगस शिक्षकांवर कारवाई होण्याची शक्यता वाढली आहे.

शिक्षण परिषदेच्या आयुक्तापासून अनेकांचा गैरप्रकारात समावेश असलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा प्रकरणात सात हजार ८०० अपात्र उमेदवारांना पात्र ठरवल्याचे समोर आले होते. अपात्र उमेदवारांकडून प्रत्येकी एक ते अडीच लाख रुपये घेऊन त्यांना प्रमाणपत्र दिल्याचे पोलीस तपासातून निष्पन्न झाले. यानंतर आता संबंधित बोगस शिक्षकांची यादी तयार करण्यात आली आहे.

राज्यातील बोगस शिक्षकांविरोधात पोलिसांनी दंड थोपटले आहेत. या शिक्षकांवरचे आरोप सिद्ध झाल्यानंतर त्यांच्यावर ही कारवाई होणार आहे. या परिक्षेच्या निकालातील अंतिम १६ हजार ७०५ पात्र परीक्षार्थ्यांचे कंपनीकडील डाटासंबंधी तांत्रिक विश्लेषण आणि आरोपींकडून मिळालेला डिजिटल पुरावा याचा एकत्रित तपास. तसेच परीक्षार्थींचे ओएमआर शिटस याचा तपास करून एकूण सात हजार ८८० अपात्र परीक्षार्थींना पात्र करण्यासाठी त्यांच्या मुळ गुणांमध्ये वाढ करून त्यांना पात्र केल्याचे निष्पन्न झालेले आहे. या परीक्षार्थींची संख्या आणखी वाढ होवू शकते, अशी माहिती पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी दिली.

## रायगड जिल्ह्यात कोरोनाचे ११७ रुग्ण

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात बुधवार दि. ९ फेब्रुवारी रोजी कोरोनाच्या ११७ नव्या रुग्णांची नोंद झाली असून उपचारादरम्यान आज तिन रुग्णाचा मृत्यू झाला आहे. तर दिवसभरात ६८० रुग्ण कोरोनामुक्त झाले अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली. बुधवारी पनवेल महापालिका हद्दीत ३५, पनवेल ग्रामीण १३, उरण ३, खालापूर ५, कर्जत ३, पेण ११, अलिबाग १९, मुरुड १, माणगाव ३, १, रोहा ७, सुधागड १, श्रीवर्धन १२, म्हसळा ३ व महाड १ असे ११७ रुग्ण आढळले. तळा, पोलादपूर या दोन तालुक्यात आज एकही नवीन रुग्ण आढळला नाही. आतापर्यंत रायगड जिल्ह्यातील एकूण कोरोना बाधित रुग्णांची संख्या २ लाख १३ हजार ५८३ झाली आहे. यापैकी २ लाख ७ हजार ४४० रुग्ण कोरोनातून बरे झाले आहेत. तर मृतांचा आकडा ४ हजार ६६८ वर गेला आहे. सद्यस्थितीत १ हजार ४७५ सक्रीय रुग्ण कोरोनावर उपचार घेत आहेत.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| **Tend-30/ 7000021938** | Work of Supply & installation of 36KV Galvanized CT at various substation under EHV (O&M) Circle, Panvel **(Re-tender)** | Rs. 99.67 Lakhs |

EMD 1% of estimated cost & Tender fee Rs.500/- + GST. **Submission of bids from 10.02.2022 to 17.02.2022 up to 23:59 hrs, Opening date:-17.02.2022.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer(Adm)
Tel No. 022-27459624, Mob. No. 9167026141
E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

क्र.पो.न.प./ई-निविदा/१२५/२०२२
पोलादपूर नगर पंचायत, पोलादपूर, जि. रायगड
email- poladpurnagarpanchayat@gmail.com
दिनांक : ०९-०२-२०२२

**जाहीर ई-निविदा सूचना**

पोलादपूर नगरपंचायत खालील नमूद कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई-निविदा मागविणेत येत आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव (पूर्ण तपशीलासह) | कामाची अंदाजित रक्कम रु. | कामाची इसारा रक्कम रु. | सुरक्षा अनामत ० % रोखीने | सुरक्षा अनामत ९ % बिलातून | निविदा फार्म फी | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग | काम पूर्ण करणेची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५अ | ५ब | ६ | ७ | ८ |
| १ | नगरपंचायत पोलादपूर हद्दीतील शिवाजीनगर येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण व स्लब ड्रेनेज बांधणे. | ३८,१५,४८७/- | ३८,१५५ | - | ३,४३,३९५/- | ५९०/- | वर्ग ५ ब त्यावरील | ६ महिने |
| २ | पोलादपूर शहराला पाणीपुरवठा करणारी जकवेल क्र.१ नव्याने बांधणे व पंप्पींग मशीनरी बसविणे. | १,१६,९९,४९५/- | १,१६,९९५/- | २३,०४०/- | १०,५२,९५५/- | ११८०/- | वर्ग ४ ब | १२ महिने |

अटी/शर्ती :-
१) सदर संपूर्ण प्रक्रिया ई-निविदेद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.
२) वरील कामाची ई-निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर खालील दिलेल्या कालावधीत असेल.

| क्र. | तपशील | सुरु दिनांक | वेळ | समाप्त दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धी | १०-०२-२०२२ | सकाळी ११.०० | | |
| २ | कामाची निविदा पूर्व बैठक | २८-०२-२०२२ | दुपारी ३.०० | | |
| २ | कागदपत्रे डाऊनलोड करणे | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० | ०७-०३-२०२२ | दुपारी ३.०० |
| ३ | निविदा ऑनलाईन भरणेचा कालावधी | ११-०२-२०२२ | सकाळी ११.०० वाजलेपासून | ०७-०३-२०२२ | दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ४ | ऑनलाईन निविदा उघडणेचा कालावधी | ०९-०३-२०२२ | सकाळी ११.०० वा. किंवा प्रशासकीय सोईनुसार | | |

१) सदर निविदेबाबत मक्तेदाराला दिनांक ०७-०३-२०२२ रोजीपर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत वर नमूद केलेली ई-निविदेची निविदा फी रक्कम ऑनलाईन पेमेंटद्वारे भरुन ती मुळप्रत ऑनलाईन लिफाफा १मध्ये स्कॅन करुन अपलोड करावी लागेल.
२) सदर निविदेबाबत वर नमूद केलेली ई-निविदेची इसारा रक्कम (EMD) ऑनलाईन पेमेंटद्वारे भरून ती मुळप्रत ऑनलाईन लिफाफा १ मध्ये स्कॅन करून अपलोड करावी लागेल. व सदरची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची भरत असल्यास शासन निर्णयाप्रमाणे अधिकृत बँकेचा डी.डी.मा.मुख्याधिकारी, पोलादपूर नगरपंचायत यांचे नावे काढून निविदा उघडण्याच्या अगोदर कार्यालयात जमा करावा. तसेच कामाची ई-निविदा भरतेवेळी इच्छुक कंत्राटदाराने संपूर्ण कामाची माहिती घेऊन ई-निविदा सादर करावी. नमूद केलेले दर सर्व करांसहीत असावेत.
३)ई-निविदा प्रक्रियेचा तपशील वरील संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दिनांक ११-०२-२०२२ पासून उपलब्ध होईल.
४)ठेकेदाराने ई-निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावा. तसेच क्र.१ च्या लिफाफ्यात तांत्रिक बाबींची कागदपत्रे व क्र.२ च्या लिफाफ्यामध्ये वित्तीय बाबींचा कागदपत्रे स्कॅन करून PDF Format मध्ये अपलोड करावीत. लिफाफा क्र.२ (वित्तीय बोली) वा लिफाफा उघडयापूर्वी लिफाफा क्र.१(तांत्रिक बोली) चा लिफाफा मधील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता असणे आवश्यक आहे. त्याऐवजी लिफाफा क्र.२ उघडता येणार नाही. ई-निविदा फॉर्ममधील सर्व अटी व शर्ती निविदा सादर करताना बंधनकारक राहतील. तसेच सदर निविदेबाबत काही अंका उद्भवल्यास पुढील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. ०२१९१ २४०००१, ८६६९४८६५५५
५)कारण नमूद करून अथवा कारण न देता आलेल्या ई-निविदा स्वीकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगर पंचायतीने राखून ठेवला आहे.

सही/-
**(श्री.महादेव बा.रोडगे)**
**मुख्याधिकारी**
**पोलादपूर नगर पंचायत**

सही/-
**(श्रीमती प्रतिमा पुदालवाड)**
**प्रशासक**
**पोलादपूर नगर पंचायत**

# वर्षभरात रायगडात निवडणुकांची रणधुमाळी

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

**वर्षभरात रायगड जिल्ह्यातील २६५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. नुकत्याच झालेल्या नगरपंचायतीच्या निवडणुका आणि आगामी काळातील नगरपालिका, जिल्हा परिषद, ग्रामपंचायतींच्या निवडणुका यामुळे जिल्ह्यात निवडणुकीची रणधुमाळी आणि राजकीय पटलावरील विविध रंग पहायला मिळणार आहेत.**

मुदत संपलेल्या आणि नव्याने अस्तित्वात आलेल्या रायगड जिल्ह्यातील २६५ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका होऊ घातल्या आहेत. या २६५ ग्रामपंचायतींपैकी ३४ ग्रामपंचायतींची मुदत २०२१ मध्ये संपलेली आहे. तर उर्वरित २३१ ग्रामपंचायतींची मुदत या वर्षभरात संपत आहे. गेल्या दोन वर्षांतील कोरोना महामारी यामुळे काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका मुदतीत होऊ शकलेल्या नाहीत. पनवेल तालुक्यातील उलवे, तळघर, वडघर या ग्रामपंचायतीतील गावे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे बाधित झाली आहेत.




**265**
**ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका, इतर मागासवर्गीय आरक्षणासह निवडणुका**

**स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एससी, एसटीचे घटनात्मक आरक्षण अबाधित ठेऊन ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत ओबीसींना आरक्षण देण्याची शिफारस राज्य मागासवर्ग आयोगाने रविवारी राज्य सरकारला केली. राज्यातील जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत पातळीवर ओबीसींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्याचीही शिफारस या अहवालात असल्याचे सांगितले जाते.**

**उरण-** पाणजे, नवीन शेवा, बोकडविरा, पागोटे, चिले, रानसई, सारडे, पुनाडे, घारापुरी, जसखार, डोंगरी, भेंडखळ, धुतुम, कळंबुसरे, पिरकोन, वशेणी, करळ, नवघर, **रोहा-** खैरे खुर्द, पहुर, तळवली, अष्टमी, दापोली, **म्हसळा-** देवघर, लेप, घोणसे, कांदळवाडा, तोंडसुरे, काळसुरी, फळसप, निगडी, रेवळी, कणघर, तोराडी, संदेरी, खरसई, **सुधागड-** शिळोशी, आपटवणे, सिध्देश्वर बु., आतोणे, चिवे, अडुळसे, खवली, खांडपोली, तिवरे, घोटवडे, माणगांव बु., ताडगांव, चंदरगांव, हातोड, **महाड-** आंबवडे, आचळोली, आढी, आदिस्ते, बिजघर, बारसगाव, चिभावे, चिभावे मोहल्ला, चांभारखिड, दासगाव, दापोली, दादली, धामणे, गोंडाळे, गोठे बुद्रक, घावरेकोंड, जुई बु. कुंबळे, करंजाडी, केंबुर्ली, कावळे, विन्हेरे, कोझर, कोळोसे, करंजखोल, कुसगाव, कांबळे, बिरवाडी, किंजळघर, कोल, कोथेरी, कुर्ले, खुटील, लोअर, तुडील, लाडीवली, मोहोत, मोहोने, नातोंडी, नागांव, नाते, नांदगाव बु., निगडे, नडगाव तः बिरवाडी, नडगांव तः तुडील, पाचाड, पुनाडे, पारमाची, पंदेरी, पिंपळवाडी, पाले, फाळकेवाडी, रावतळी, राजिवली, रानवडी खु., रुपवली, सावरट, सवाणे, शिरवली, शिरसवणे, शिरगांव, ताम्हाणे, तळीये, अप्पर तुडील, उंदेरी, वहूर, वीर, वराठी, वाळसुरे, वाळणे खु., वारंगी, वाघोली, वरंध, वडवली, वामणे, साकडी, खरवली, **अलिबाग-** आक्षी, कोप्रोली, नवेदर नवगाव, बोरीस, नारंगी, मुळे, शिरवली, वैजाळी, वेश्वी, **तळा-** रहाटाड, **पनवेल-** चिंध्रण, वाघिवली, शिरढोण, शिवकर, कानपोली, करंजाडे, भाताण, नितळस, केळवणे, नेरे, दिघाटी, खेरणे, उलवे, तळघर, वडघर **पेण-** करोटी, आंबिवली, डोलवी, मुंढाणी, वाशीवली, सावरसई, कणे, कोलेटी, पाटणोली, निगडे, वरप, हमरापूर, जिते, आमटेम, कळवे, सापोली, वरसई, मसद बु., मळेघर, कोप्रोली, दादर, सोनखार, दूरशेत, खरोशी, काराव, कोपर, **पोलादपूर-** पैठण, कोतवाल खु., बोरघर, कालवली, उमरठ, चांभारगणी बु., कोतवाल बु., पार्ले, दिवील, कापडे खु., धामणदिवी, भोगाव खु., परसूले, लोहारे, आंबेळी, गोळेगणी, तुभे बु., तुर्भेखुर्द, तुर्भेखोडा, क्झरवाडी, **खालापूर-** चावणी, खरीवली, माडप, नडोदे, आपटी, वडवळ, साजगांव, होराळे, देवन्हावे, टेंभरी, हाळखुर्द, वावोशी, वावंढळ, गोरठण बु. चौक, आसरे, लोधिवली, तुपगाव, **मुरुड-** काकळघर, तेलवडे, कोर्लई, वावडुंगी, वेळास्ते, **श्रीवर्धन-** दिवेआगर, कुडकी, गुळधे, रानवली, चिखलप, मेघरे, जसवली, वाळवटी, कुडगांव, शेखाडी, सर्वे, सायगांव, वांजळे, साखरोणे, आदगाव, **कर्जत-**दहिवली, तः वरेडी, कळंब, कोदिवडे, मांडवणे, उक्रूळ, वावळोली, वेणगांव, पोटल, पाली तर्फे कथल खलाटी, **माणगाव-** करंबेळी, कुमशेत, कुंभे, गोरेगांव, न्हावे, पहेल, भागाड, मांगरुळ, मुठवली तः तळे, डोंगरोली, शिरवली तः निजामपूर, साई, हरकोल, होडगांव, दहिवली कोंड, पळसप, चिंचवली, टोळखुर्द, नांदवी, देगांव, पन्हळघर बु., पन्हळघर खु. या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका वर्षभरात होऊ घातल्या आहेत.

## महत्वाचे

### आरोग्य विभागाच्या खर्चास मंजूरी

**पनवेल :** कोरोना साथरोगामध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी पीपीई किट खरेदसाठी होणाऱ्या खर्चास व दरास मान्यता मिळणे तसेच महापालिका क्षेत्रात कोरोना चाचण्या करण्यासाठीच्या दरास मान्यता देण्याच्या विषयास स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. आज महानगरपालिकेची स्थायी समितीची ऑनलाईन सभा ८ फेब्रुवारी रोजी मुख्यालयातील आयुक्त दालनासमोरील सभागृहात स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

### सहजसेवा फाऊंडेशनचा गौरव

**रसायनी :** सहजसेवा फाऊंडेशन सामाजिक कार्यात अग्रेसर असते. सातत्यपूर्ण उपक्रम ही सहजसेवेची ओळख आहे तर सामाजिक उपक्रमातुन नवनवीन जागतिक रेकॉर्ड ही संस्थेची उपलब्धी आहे. दिनांक १९ डिसेंबर २०२१ रोजी वीटभट्टी कामगारांच्या मुलांसाठी सुरू केलेली शाळा ही वंचित व उपेक्षित घटकांच्या मुलांसाठी वरदान ठरत आहे. झाडाखाली भरलेल्या शाळेला खऱ्या खुऱ्या शाळेचे रूप आलेले आहे. समाजातील अनेक दानशूर व्यक्ती व संस्था या शाळेसाठी भरीव योगदान देत आहेत. या उपक्रमाची जागतिक उपक्रम म्हणून नोंद झालेली आहे.

### खांब येथे धार्मिक कार्यक्रम

**खांब :** रोहे तालुक्यातील खांब येथे सेवानिवृत्त वनाधिकारी शंकर धनावडे यांच्या निवासस्थानी पुर्वजांच्या स्मृतीप्रित्यर्थ विचार प्रकारचे धार्मिक कार्यक्रम संपन्न करण्यात आले. गेल्या अनेक वर्षापासून शंकर धनावडे यांच्या निवासस्थानी हा धार्मिक कार्यक्रम मोठ्या भक्तीभावाने संपन्न होत आहेत. पुर्वजांच्या आत्मशांतीसाठी व मनशांतीसाठी आजोबा स्व. वेटू दगडू गोसावी, आई गंगाबाई गौरू गोसावी, वडील गौरू वेटू गोसावी, चि.विश्वास शंकर धनावडे, सुरेश महाराज पालवणकर यांचे स्मरणार्थ श्री.रामचरित मानस ग्रंथाची सांगता, हळदीकुंकू समारंभ, विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींचा सन्मान, वैभव महाराज खांडेकर यांचे प्रवचन व हरिकिर्तन, हरिपाठ, आदी कार्यक्रम मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न करण्यात आले.

# अवैध पार्किंग करणाऱ्यांवर कारवाई

## वाहतूक पोलिसांची ३० हजारांची दंडवसुली

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

पाली खोपोली राज्य महामार्गावर सुधागड तालुक्याचे प्रवेशद्वार म्हणून ओळख असलेल्या परळी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. या पार्श्वभूमीवर अस्ताव्यस्त लावलेल्या वाहनांवर पाली वाहतूक पोलिसांनी धडक कारवाई करीत ३० हजारांचा दंड वसूल केला.



ग्रामस्थांनीदेखील परळी बाजारपेठेतील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर पाली पोलिसांच्या वाहतूक शाखेने तसेच पाली पोलीस ठाणे अंतर्गत जांभुळपाडा पोलीस दूर क्षेत्राचे पोलीस यांनी संयुक्तरीत्या बाजारपेठेत धडक मोहीम राबविली. या मोहिमेत साधारणपणे ५८ केसेस करण्यात आल्या, तर २९,५०० रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली. यावेळी एएसआय मोहन म्हात्रे, एस.एस. खेडेकर, निलेश महाडिक, कांचन भोईर, बी.एच. वाव्हळ आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## रेशन दुकानांना धान्य वितरित करणाऱ्या

# सहा वाहनचालकांचीच उपासमार

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

कोरोनाच्या महामारीत सुधागड तालुक्यातील ६२ रास्त भाव धान्य दुकानात रेशन वितरित करणाऱ्या सहा वाहनचालकांना अद्यापदेखील थकीत भाडे रक्कम मिळालेली नाही. स्वतःच्या खिशातील पदरमोड करून कर्जउसनवारी काढून डिझेल खर्च केला, मात्र अद्याप आम्हाला एक दमडीही दिली नसल्याने आमच्यावर उपासमार व त्याही पुढे जाऊन आत्महत्येची वेळ आली असल्याचे रेशन वितरित करणाऱ्या वाहनचालकांनी सांगितले.

थकीत भाडे न मिळाल्याने आमच्यावर आत्महत्येची वेळ आली असल्याचे वाहनचालक संजय बारस्कर, सुनील उंबरठकर, अरविंद उंबरठकर, संतोष शिंदे, शंकर शिंदे, सचिन भोईर यांनी सांगितले. या वाहनचालकांनी मुख्यमंत्री ठाकरे यांच्याकडे निवेदन देऊन आपली थकीत रक्कम मिळावी, अशी मागणी केली आहे. तक्रारी निवेदनात म्हटले आहे की, पाली सुधागड तहसील कार्यालय अन्न धान्य गोडाऊन येथून कोरोना काळात मार्च २०२० ते सप्टेंबर २०२० कालावधीमध्ये आम्ही आमची वाहने घेऊन तालुक्यातील सर्व ठिकाणच्या रास्त भाव धान्य दुकान यांना तहसील कार्यालय पाली अन्न धान्य गोडाऊन येथून धान्य उचलून ते रास्त भाव धान्य दुकानपर्यंत सरकारी



आदेशाप्रमाणे मोफत धान्य व विकत धान्य पोचविण्याचे काम केले.

यावेळी गोदामपाल म्हणून कमलेश गुंड हे काम पाहात होते. त्यावेळी वाहनचालक यांनी भाडे मिळण्यासाठी कमलेश गुंड यांना विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. परंतु एक वर्षे होऊन गेल्यानंतर सुधागड तालुक्यातील तहसीलदार यांना अर्ज करून न्याय मागण्याचे प्रयत्न केले. परंतु, कोणीही न्याय देत नाही, अशी व्यथा या वाहनचालकांनी मांडली. कोरोना महामारीत या वाहन चालकांपुढे उपासमारीची वेळ आली आहे.

> **जिल्हाधिकारी यांनी रास्त भाव धान्य दुकानात धान्य पोहोचविण्याचा ठेकेदाराला ठेका दिला, त्यांनी सबठेकेदार यांना काम दिले, जिल्हा पुरवठा विभागाकडून मुख्य ठेकेदार यांना सदरचे बिल तात्काळ वितरित करण्यात आले आहे.**
> **– श्री. बोडके, जिल्हा पुरवठा अधिकारी**

# कर्जत येथे रेल्वेच्या ठेकेदाराकडून वीज चोरी

## महावितरणची मामुली कारवाई

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत येथे मध्य रेल्वेच्या पनवेल मार्गिकेचे काम सुरू आहे. त्या कामातील कर्जत भागात नवीन पुलाचे काम केले जात आहे. या पुलाच्या कामासाठी आवश्यक असलेली वीज ठेकेदाराने चोरून वापरली आहे. त्याबद्दल महावितरण कंपनीला माहिती मिळताच धाड टाकण्यात आली. पण महावितरण कंपनीकडून किरकोळ कारवाई करून ठेकेदार कंपनीला सोडून देण्यात आले.



कर्जत रेल्वे स्टेशन जवळच असणाऱ्या किरवली ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या पुलाचीवाडी परिसरात येणाऱ्या व रेल्वे पटरीच्या पलीकडील हद्दीत रेल्वे लोको शेड रेल्वे गाड्या उभ्या राहण्यासाठी प्लॅटफॉर्मचे काम ठेकेदारी पद्धतीने चालू आहे. याठिकाणी कामगारांना राहण्यासाठी शेड देखील ठेकेदाराने बांधून दिले आहेत. येथे काम चालू असताना विजेचा वापर प्रामुख्याने गरजेचा असताना ठेकेदाराने वीज कंपनीकडून कुठल्याही प्रकारची रितसर कागदपत्रे देऊन मीटर न घेता बेकायदेशीरपणे आकडा टाकून वायर घेऊन वीज चोरी केली जात होती. येथील ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी वीज कंपनी कार्यालय कर्जत येथे तक्रार केली. कोरोना काळात वीज बिल भरले नाही म्हणून सर्वसामान्य ग्राहकांना घराची वीज विनाविलंब तोडणारे, आकडा टाकणारे, मीटरमध्ये फेरफार केल्यास वीज चोरी प्रकरणी नियमानुसार सर्वसामान्य नागरिकाला हजारोंचा दंड ठोकणारे महावितरणचे अधिकारी व कर्मचारी वीजचोर ठेकेदाराला पाठीशी का घालत आहेत? असा सवाल आता या प्रकरणात उपस्थित झाला असून हे प्रकरण वीज कंपनीचे उपकार्यकारी अभियंता प्रकाश देवके, अभियंता डफळ आणि या विभागात काम करणारे वायरमन यांची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

## लालपरीच्या उत्पन्नात

# ३० टक्क्यांनी वाढ

**जिल्ह्यातील आगार**

**रायगड जिल्ह्यात कर्जत, पेण, अलिबाग, मुरुड, रोहा, माणगाव, महाड व श्रीवर्धन असे एकूण आठ आगार आहेत.**



**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यात आतापर्यंत राज्य परिवहन महामंडळाचे ४० टक्के कर्मचारी पुन्हा कामावर रुजू झाले आहेत. त्यामुळे आठ आगारांतून एसटीच्या दिवसाला सरासरी ४५० फेऱ्या होत आहेत. शिवाय, प्रवाशांचा प्रतिसाद देखील चांगला मिळत आहे. परिणामी, मागील महिन्यात जिल्ह्यात एसटीचे दिवसाला सात लाख रुपये असणारे उत्पन्न या महिन्यापासून दिवसाला तब्बल दहा लाखांवर गेले आहे.

मागील तीन महिन्यांपासून राज्य परिवहन मंडळाचे कर्मचारी संपावर गेले आहेत. यातील काही कर्मचारी पुन्हा कामावर परतत आहेत. यामुळे जिल्ह्यात देखील परिवहन मंडळाच्या गाड्या काही प्रमाणात धावताना दिसत आहेत. गाड्यांच्या फेऱ्या हळूहळू वाढत असल्याने प्रवाशांच्या दृष्टीने खूप सोयीचे होत आहे. त्यामुळे अनेक प्रवासी स्थानकात व रस्त्यावर एसटीची वाट पाहताना दिसत आहेत. लांब पल्ल्याच्या गाड्यादेखील भरून जात आहेत. शिवाय, कमी पल्ल्याच्या गाड्यांमुळे खेड्यापाड्यातील लोकांची काही अंशी सोय झाली आहे. अनेक लोक स्थानिक व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप व फेसबुकवर गाड्यांचे वेळापत्रक आवर्जून शेअर करत आहेत. ज्यामुळे प्रवासी त्यावेळेस स्थानकात दाखल होतात. शिवाय, त्यांना गाड्यांची माहिती देखील मिळते. अतिरिक्त खर्च करून खासगी वाहनांनी जाणे वाचते. परिणामी, प्रवाशांची वेळ व पैसे देखील वाचत आहेत, असे एका प्रवाशाने सांगितले.

**कर्मचाऱ्यांची स्थिती**

**एसटीच्या संपापूर्वी या आठही आगारांत जवळपास २२५२ कर्मचारी होते. ज्यामध्ये वाहक, चालक, प्रशासन, अधिकारी, लेखा, कारकून व यांत्रिक विभाग आदी विविध कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यातील जवळपास ८५० ते ९०० कर्मचारी आजघडीला कामावर परतले आहेत. यामध्ये जवळपास २५० वाहन चालक व वाहक आहेत.**

**गाड्या व फेऱ्या**

**आठ आगारांत सर्वसाधारणपणे ४५० गाड्या आहेत. त्यातील ३५० गाड्या संपाआधी वापरल्या जात होत्या. सध्या संपामुळे यातील १०० गाड्या वापरल्या जात आहेत. आणि आठ आगारांतून रोजच्या तब्बल ४५० फेऱ्या होत आहेत.**

**उत्पन्नात वाढ**

**मागील महिन्यापर्यंत या ८ आगारांतून दिवसाला एकूण ७ लाख उत्पन्न मिळत होते. मात्र या महिन्यात उत्पन्न दिवसाला १० लाखांवर गेले आहे. असाच प्रतिसाद राहिल्यास आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.**

> **अजूनही काही कर्मचारी कामावर रुजू होत आहेत. परिवहन मंत्र्यांनी आत्ता जे शेवटचे आवाहन केले तेव्हा जवळपास १०० कर्मचारी हजर झाले आहेत. उपलब्ध संसाधने व कर्मचाऱ्यांद्वारे परिवहन सेवा सुरू आहे. प्रवाशांचा प्रतिसाद देखील खूप चांगला.**
> **– अनघा बारटक्के, विभाग नियंत्रक, परिवहन महामंडळ, पेण-रायगड**

# शासकीय कामात अडथळा

## १६ जणांवर गुन्हा दाखल

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

मत्स व्यवसाय विभागाचे परवाना अधिकारी यांनी अवैध मासेमारी करणाऱ्या पर्ससीनेट नौकेवर कारवाई करत असताना, तांडेल व खलाशी एकूण १६ जणांनी शासकीय कामात अडथळा आणल्याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे नोंदविलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मत्स व्यवसाय विभागाचे परवाना अधिकारी आपल्या पथकासह हे अवैध रितीने मासेमारी करणाऱ्या नौकांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी दि. ५ फेब्रुवारी रोजी रात्री पावणे दहाच्या सुमारास आक्षी साखर ०२ नॉटिकलमेल परिसरात गस्त घालीत असताना, अवैधरित्या मासेमारी करत असलेली नोंदणी क्रमांक आय.एन.डी.एम.एच. ०३-एम.एम.४९२६ पर्ससीनेट नौका सागरकन्या सापडली. यामधील मच्छी जप्त करून तिचा लिलाव करण्यासाठी या सागरकन्या नौकेला दोरी बांधून समुद्रातून ०२ नॉटिकलमेल अंतरावरून नेत असताना, या नौकेवरील तांडेल सिकंदर निशाद याने बोटीवरील इतर आरोपी यांच्याशी संगनमत करून नौकेला बांधलेली दोरी कापत असलेले पाहून मत्स्यव्यवसाय विभागाचे परवाना अधिकारी यांनी त्यांची गस्ती नौका सागरकन्या नौकेजवळ आणली. यावेळी मत्स्य व्यवसाय विभागाचे परवाना अधिकारी यांच्या डोक्याला हात मारून ढकलून दिले व इतर खलाशी यांनी शिवीगाळ व दमदाटी केली. शासकीय कामात अडथळा निर्माण करून नौका सुरू करून पळून गेले, अशी तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे मत्स्यव्यवसाय विभागाचे परवाना अधिकारी यांनी नोंदविली आहे. याबाबत रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहा. फौजदार जी.डी. म्हात्रे हे करत आहेत.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कारप्रकरणी गुन्हा दाखल

**। नेरळ । वार्ताहर ।**

नेरळ पोलीस ठाणे हद्दीतील मानिवली गावातील एका अल्पवयीन मुलीवर तिच्या घरी जाऊन जबरदस्ती करुन बलात्कार करण्यात आला. मागील दीड महिन्यात तीन ते चार वेळा अतिप्रसंग करण्यात आल्यानंतर सदर अल्पवयीन मुलगी कल्याण येथे रुग्णालयात उपचार घेत आहे. उपचार घेत असताना फिर्यादी अल्पवयीन मुलीने कल्याण येथे तक्रार दिल्यानंतर तेथून नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा वर्ग करण्यात आला आहे. मुलीच्या घरी कोणी नाही याचा फायदा घेऊन त्याच गावातील ३७ वर्षीय तरुण त्या मुलीच्या घरी जायचा आणि जबरदस्तीने त्या मुलीवर अतिप्रसंग करायचा. कल्याण येथे खासगी रुग्णालयात उपचार घेत असताना सदर प्रकाराची नोंद कल्याण येथील महात्मा फुले पोलीस ठाण्यात करण्यात आली. त्या तरुणीची फिर्याद नेरळ पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आल्यानंतर नेरळ पोलिसांनी अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक माधुरी मुळीक करीत आहेत.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **पाहिजेत स्टाफ नर्स** जन्नावार हॉस्पिटल, बाय पास रोड चेंढरे, अलिबाग. ९४२३८९०३१०
- **विवाह, पुर्नविवाह सर्वजातीय** आंतरजातीय स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ. ८८८८९३५७७५, ९२७०४३३४८७
- **श्री सिद्धीविनायक ज्योतिष** सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- **वधु २५ वर्ष,** ५-३ एफ. वाय.बी.ए. तीन बहिणी, त्वरित लग्न ७०३८४३८५०३

**जाहिरातीसाठी संपर्क**
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी प्रशासन सज्ज

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन सज्ज होत असून, नागरिकांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. तसेच पाणी टंचाई निर्माण झाल्यास त्याचा मुकाबला करण्यासाठी ९ कोटी ९४ लाख २४ रुपयांचा पाणी टंचाई आराखडा तयार करुन मंजुरीसाठी वरिष्ठ स्तरावर पाठविण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यातील काही गावांना एप्रिल, मे महिन्यात दरवर्षी पाणी टंचाईचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आत्तापासूनच उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा, अपव्यय करू नये, पिण्याच्या पाण्याच्या मुख्य स्त्रोतांव्यतिरिक्त परिसरातील इतर उपलब्ध स्त्रोतांमधील पाण्याचा दैनंदिन वापरासाठी वापर करावा, पाणी स्त्रोत दूषित होणार नाहीत याची सर्वांनी काळजी घ्यावी, कुठे पाणी पुरवठा पाइपलाइन फुटली असल्यास निदर्शनास आणून द्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

**९ कोटी ९४ लाख २३ हजार रुपयांचा आराखडा**

**जिल्ह्यात संभाव्य पाणीटंचाई निर्माण होणारी गावे आणि वाड्यांमध्ये ५२१ गावे आणि १ हजार ३१४ वाड्यांचा समावेश आहे. या गावांमधील नागरिकांची तहान भागविण्यासाठी प्रशासनाने पाणीपुरवठा करण्याच्या उपाययोजनांचा आराखडा तयार केला आहे. यामध्ये १ हजार १६६ गावे आणि वाड्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी ४ कोटी ३९ लाख ३१ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. जिल्ह्यातील ४६ नळ पाणीपुरवठा योजनांची विशेष दुरुस्ती करण्यासाठी १ कोटी १४ लाख ७५ हजार रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे. विंधण विहिरींच्या विशेष दुरुस्तीसाठी १९ लाख ३८ हजार रुपये खर्च करण्यात येणार आहेत. १०१ विहिरींमधील गाळ काढण्याबरोबरच त्यांची खोली वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. यासाठी संभाव्य टंचाई कृती आराखड्यामध्ये ८४ लाख १५ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित धरला आहे. पाणीटंचाई दूर करण्यासाठी ४४६ विंधण विहिरींची निर्मिती करण्यावर भर दिला जाणार आहे. यासाठी ३ कोटी ३६ लाख ६४ हजार रुपयांची मागणी जिल्हा प्रशासनाने शासनाकडे केली आहे.**

**नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन**

जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी, उपाध्यक्ष सुधाकर घारे, अर्थ व बांधकाम समिती सभापती नीलिमा पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती गीता जाधव, समाजकल्याण समिती सभापती दिलीप भोईर, कृषी पशुसंवर्धन सभापती बबन मनवे, विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्यासह सर्व जिल्हा परिषद सदस्य जिल्ह्यातील संभाव्य पाणी टंचाई व करण्यात येणाऱ्या उपाययोजना यावर लक्ष ठेऊन आहेत.



# पनवेलमध्ये 'क्लीनअप मार्शल'ची नजर



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छतेवर भर देण्यात येत आहे. परिसर स्वच्छतेबरोबरच मास्क न वापरणाऱ्यांवर आता पनवेल महापालिकेचे 'क्लीन अप मार्शल' लक्ष ठेवून असणार आहेत. यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पालिकेच्या 'क्लीनअप मार्शल'ची नेमणूक करण्यात आली आहे. बेशिस्त नागरिकांवर आता या 'क्लीनअप' मार्शलची नजर असणार आहे.

त्याचबरोबर स्वच्छतेच्या बाबतीत नागरिकांनी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर क्लीनअप मार्शलमार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. पालिका क्षेत्रात बेशिस्त नागरिकांकडून आता पर्यंत जवळपास अडीच लाख रुपयांच्या वरती दंड आकारण्यात आला आहे. क्लीनअप मार्शलच्या माध्यमातून सुरु असलेल्या कारवाईचे शिस्तप्रिय नागरिकांनी स्वागत केले आहे.

पनवेल स्वच्छ आणि सुंदर ठेवताना रस्त्यांवर कुठेही थुंकणाऱ्या 'बहाद्दरां'वर क्लीन-अप मार्शल कडून कडक कारवाई करण्यात येत आहे. महापालिकेकडून आता प्रत्येक प्रभागात कंत्राटी पद्धतीने ४ ते ६ क्लीन-अप मार्शल नेमले आहेत. या पद्धतीने सध्या १५ ते ३० क्लीन-अप मार्शल शहर स्वच्छतेची जबाबदारी सांभाळत आहेत. मास्कचा वापर न करणाऱ्यांविरोधात क्लीन-अप मार्शलसह पोलीस, रेल्वे परिसरात कारवाई केली जात आहे. मास्कचा वापर न करणाऱ्याविरोधात ५०० रु. दंड आकारला जात आहे.

> काही बेजाबदार नागरिकांमुळे घाणीचे साम्राज्य निर्माण होते व अशा अस्वच्छतेमुळे डासांची निर्मिती होते. आणि त्याचा परिणाम नागरिकांच्याच आरोग्यावर होत असतो. पालिका प्रशासनाकडून वेळोवेळी स्वच्छतेविषयी जनजागृती सुद्धा करण्यात येत असते. परंतु आपला परिसर आपले शहर स्वच्छ ठेवणे हि सुद्धा नागरिकांची जबाबदारी आहे.
>
> –सचिन पवार उपआयुक्त

| आत्तापर्यंत ५७४ बेजाबदार | नागरिकांवर दंडात्मक कारवाई |
|---|---|
| सोशल डिस्टन्स | २९७ नागरिक |
| चेहऱ्यावर मास्क न लावणे | ४०१ नागरिक |
| उघड्यावर शौचास बसणे | ४० नागरिक |
| बेकायदेशीर प्लास्टिक पिशवीचा वापर | १ नागरिक |
| रस्त्यावर थुंकणे | ७ नागरिक |
| रस्त्यावर कचरा फेकणे | ३ नागरिक |

| गुन्हे | दंडाची रक्कम |
|---|---|
| रस्ते/मार्गावर घाण करणे | १५० रुपये दंड |
| सार्वजनिक ठिकाणी थुंकणे | १०० रुपये दंड |
| उघड्यावर लघवी/लघुशंका करणे | १०० रुपये दंड |
| उघड्यावर शौच करणे | ५०० रुपये दंड |
| प्लास्टीक बंदीचा पहिला गुन्हा | ५००० रुपये दंड |
| प्लास्टीक बंदीचा दुसरा गुन्हा | १०,००० रुपये दंड |
| प्लास्टीक बंदीचा तिसरा गुन्हा | ५,००० रुपये दंड |

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल नदीम रईस रा.सदनिका नं ३०४, तिसरा मजला, जे.एम.टॉवर अंसारी चौक, कल्याण, पश्चिम यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक निरज तुलसीदास शर्मा रा.स्वस्तिक प्लाझा, व्हि.एल.मेहता रोड जुहू मुंबई यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मौजे साळोख तर्फे वरेडी, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्वे नं | हिस्सा नं /हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ४८ | ५/अ | ४-४६-०० पो.ख ०-२१-०० यापैकी लिहून देणार यांचे हिश्याचे क्षेत्र २-००-०० पैकी विकत दिलेले क्षेत्र ०-८०-० गुंठे | ३-६० |

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १०/०२/२०२२

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड.स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता-मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं.२४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती शांताबाई भगवान साळुंखे यांजकडून विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड**

| गट क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ६५ | ०-१६-० | ०.१६ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करुन पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १०/०२/२०२२

**ॲड. रविंद्र विनायक ओक**
'गुरुकृपा' महर्षी कर्वे रोड,
अलिबाग अर्बन बँकेजवळ, अलिबाग

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, त्या मिळकतींचे मालक फेलिक्स बॅप्टिस्ट डिसोजा व हिल्डा फेलिक्स डिसोजा यांचेकडून विकत घेणेच्या ठरविल्या आहेत.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १०५ | १ | १-५०-९० | ३-३१ |
| १०५ | २ | ०-५८-७० | १-४४ |
| १०५ | ३ | ०-२१-२० | ०-५२ |

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १०-०२-२०२२

**ॲड. सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत
जि. रायगड- ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे मुगपे, ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमिन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सावियो अग्नेलो कुटीन्हो यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे मुगपे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १ | १ | ०-४३-०० | ५-०७ |
| १ | २ | १-६०-६० | १७-८२ |
| १ | ६ | ०-२१-२० | १-८२ |
| २ | १ | ०-८६-९० | ३-०० |
| २ | ३ | ०-२२-०० | १-५६ |
| २ | ४ | ०-४०-०० | ०-३४ |
| ४ | १ब | ०-१६-७० | ०-४८ |
| ९ | १ | ०-१८-५० | ०-९७ |
| ९ | २ | ०-०३-०० | ०-११ |
| ४७ | १० | ०-३२-५० पैकी ०-१६-३० इतके मालकीचे क्षेत्र | ०-८३ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.१०/०२/२०२२
मो.९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं.०५ अे, वृंदावन कॉप्लेक्स,
मुद्रे,कर्जत,रायगड

### जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की,

आमचे अशिल श्री. दिनेश रमेश गोरी, रा. सौरभ अपार्टमेंट, देवआळी, मु.पो.ता. पेण, जिल्हा रायगड यांनी खालील वर्णनाची बिनशेती भूखंड मिळकत, तिचे ज्ञात मालक श्री. प्रल्हाद नारायण जोशी, रा. फ्लॅट नंबर २०३, समीधा बिल्डींग, श्रीबाग नंबर ३, मु.पो. ता. अलिबाग, जिल्हा रायगड यांचेकडून कायम मालकीहक्काने खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू बिनशेती भूखंड मिळकतीचे तपशीलवार वर्णन येणेप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पेण ग्रामीण, तालुका पेण, जिल्हा रायगड येथील बिनशेती भूखंड मिळकत**

| बिनशेती सर्व्हे/गट नंबर हिस्सा नंबर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| २६६/१/अ | ११ | १.७८.०० | ११३-९२ |

वरील बिनशेती भूखंड मिळकतीचे खरेदी-विक्रीचे संदर्भात उभयता पक्षकारांमध्ये चर्चा व वाटाघाटी होऊन व्यवहार कायम झालेला आहे व आमचे अशिलांकडून भूखंड मिळकतीचे ज्ञात मालकाने बयाणाची रक्कम स्विकारलेली आहे. वर उल्लेखलेली भूखंड मिळकत पूर्णत:निर्वेध व बिनजोखमी असलेबाबतचा हवाला मिळकतीचे ज्ञात मालकाने, आमचे अशिलांना दिलेला आहे. तरी देखील सदरहू मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा, व्यक्तीचा, जमीन मिळकतीचे मुळ मालकांचा अगर त्यांचे वारसांचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, इतर कोणताही करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा, बोजा, वसुली अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, दिवाणी दावा, महसूल वाद असल्यास, प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४(चौदा) दिवसांचे मुदतीत, खालील सही करणार यांचेकडे प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने लेखी हरकत कागदोपत्री पुराव्यासह दाखल कराव्यात. विहीत मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास अथवा अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास, सदरची भूखंड मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून सदरहू भूखंड मिळकतीबाबतचा अंतिम व्यवहार आमचे अशिल, मिळकतीचे विद्यमान मालकाबरोबर नोंदणीद्वारे पूर्ण करतील. तद्नंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारध्यानी घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर केले असे.
पेण
दिनांक : १०-०२-२०२२

**ॲड. सरिता प्रविण माळी**
पत्ता : फ्लॅट नंबर २०१/०९ए, भालचंद्र कॉम्प्लेक्स,
ए विंग, दुसरा मजला, वीर सावरकर मार्ग, गोविंद बाग,
कौंडाळतळे, मु.पो.ता.पेण, जिल्हा रायगड. ४०२ १०७
भ्रमणध्वनी क्र. : ८९८३४३५१९६/७४४७६७०५५५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्रीमती सुलभा संजय कारंजकर पूर्वाश्रमीची कु. सुलभा सुधाकर क्षीरसागर, बांद्रा (पू.) मुंबई ४०० ०५१ यांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रमेश हरिश्चंद्र नाईक, वगैरे ४, रा. खारगल्ली, पो. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बयाणा पावती विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस लिहून दिलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट/भूमापन नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव, ता. अलिबाग जि. रायगड | ११९८ | ०-०१.७० पो.ख. ०-०२.८० एकूण ०-०४.५० | ०.३३ |

ही मिळकत व त्यामध्ये असलेली ग्रुप ग्रामपंचायत नागाव घर क्रमांक ९१६, क्षेत्र २३४ चौ. फूट आणि घर क्रमांक २९५५, क्षेत्र ४४८ चौ. फूट या दोनही मिळकती.

वर वर्णन केलेली मिळकत पूर्वीपासून तुकडा असून निर्वेध व बोजारहित असलेबाबत विद्यमान मालकांचे म्हणणे आहे.

तरीही वर नमूद मिळकतीत कोणाचाही हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, पोटगी, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती संदर्भात कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबित असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेकरीता खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०९/०२/२०२२

सही/-
**ॲड. विजय विठोबा पाटील,**
F-१०४, पहिला मजला, ॲकॉन्स एन्क्लेव्ह,
डॉ. पुष्पलता शिंदे हॉस्पिटल समोर, चेंढरे अलिबाग

### जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक १.दिलीप रामचंद्र देशमुख २.मधुकर रामचंद्र देशमुख ३.वसंत रामचंद्र देशमुख यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**परिशिष्ट**

| गावाचे नाव | भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.प्र) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे-इंजिवली, तालुका-कर्जत, जि.रायगड | १२/१/अ/१ | १-३९-७० यापैकी आमचे अशिल यांचे खरेदी करण्याचे ठरविलेले क्षेत्र ०-२४-०० हे.आर.प्र. | ९.३५ |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज,वहिवाट व अन्य हितसंबंध असेल तर संबंधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
दिनांक : १०/०२/२०२२

**ॲड.उमेश आनंद भगत**
(अधिवक्ता)
मु.पो.चिंचवळी ता.कर्जत
जि.रायगड
मो.नं.९०४९४८६८०५

### जाहीर नोटीस

सर्वास या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, निम्ननिर्दीष्ट मालमत्ता जमिन मालकांनी त्यांचे मालकीवहिवाटच्या व निर्वेध आहेत असा निर्वाळा दिला मिळकतीचे सर्व हक्क अधिकारसुध्दा मिळकती कायम खरेदी देणेबाबत त्यांची आमचे अशिलांजवळ बोलणी चालू आहेत. तरी व्यवहारास कायदेशीर बाधा राहू नये व टायटल तपासणीचा भाग म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी सदर मिळकती संदर्भात अन्य कोणास गहाण, दान, बक्षीस, लीन, लीज, अन्नवस्त्र, पोटगी, अदलाबदल, हवा, उजेड, जाणेयेणेचा मार्ग, इजमेंट, वहिवाट, मृत्युपत्र इ.वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी कळवावे. अन्यथा सदर नोटीस मुदत अखेर कथित हक्क अधिकार जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारे हरकतींचा विचार केला जाणार नाही.

वरीलप्रमाणे नोटीस प्रसिद्ध करणेंस येत आहे.

अ) मिळकतीचे वर्णन -मौजे थरमरी, ता.माणगांव, जि.रायगड येथील मिळकती, त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे,

| अ. नं. | भूमापन नं | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) | जमिन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | १९/१ | ३-४०-०० पैकी ०-८५-०० | १.०० | १.संध्या संजय बिनीवाले २.मालती अच्युत परांजपे |
| २. | १९/२/अ/१ | ५-२१-०० पैकी १-३०-२५ | १.३२ | ३.संजीव अच्युत परांजपे ४.सुधीर अच्युत परांजपे यांचे सर्वांच्या हिश्श्याचे क्षेत्र |

माणगांव,
दिनांक : ०९/०२/२०२२

सही/-
**ॲड.राहुल प्र.ओक**
'मानस' मुंबई-गोवा हायवे
पो.ता.माणगांव, जि.रायगड
मो.नं.८८८८३७३००५
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

### ग्रामपंचायत चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड
### जाहीर नोटीस

जा.क्र. १८६५/२०२२
दिनांक : ३१/०१/२०२२

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधांने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २ | १८०८/१ व २ | विद्यानगर पश्चिम | आर.सी.सी.पक्के बांधकाम १२५०+१२५० चौ. फूट | अक्षदा अनिल चौलकर व इतर | श्री. राजेंद्र किसनलाल जैन विणा राजेंद्र जैन |
| २ | ३ | १५६१/६ | विद्यानगर पूर्व-युनिक अपार्ट | आर.सी.सी. पक्के बांधकाम ६०३ चौ. फूट | विश्वनाथ विठोबा पवार | उत्तम विश्वनाथ पवार |
| ३ | ३ | १६८२/४ | गोंधळपाडा-सिगल रेसिडन्सी बि.क्र.२ | आर.सी.सी. पक्के बांधकाम ४३८.७९ चौ. फूट | रमेश सिधप्पा शिंदे | अतुल हरिभाऊ गवळी उर्मिला अतुल गवळी |
| ४ | ४ | १८२४/१२ | गोंधळपाडा सि-शेल सोसायटी | आर.सी.सी. पक्के बांधकाम ४५५ चौ. फूट | मे.श्रीजी एंटरप्रायझेस तर्फे पार्टनर विजयकुमार जयंतीभाई वसोया | जितेंद्र दत्ताराम पाटील संजीवनी जितेंद्र पाटील |
| ५ | ४ | १७३०/ | गोल्ड कॉस्ट सोसा | आर.सी.सी. पक्के बांधकाम ४५० चौ. फूट | एस्केअर कंस्ट्र | अविशा सागर जोशी |
| ६ | ५ | १९७१/१ | स्वामी सावली सोसा. | आर.सी.सी. पक्के बांधकाम ४११ चौ.फूट | निशा मनोहर वालेच्छा | प्रतिक प्रकाश ठाकूर प्रकाश महादेव ठाकूर |
| ७ | ४ | १८२६/११ | सि-शेल सोसा | आर.सी.सी. पक्के बांधकाम ५२१ चौ.फूट | मे. श्रीजी एंटरप्रायझेस तर्फे पार्टनर विजयकुमार जयंतीभाई वसोया | रेश्मा जितेंद्र सरोटे |
| ८ | ३ | ३६८/२ | सांझवात सोसा. | आर.सी.सी. पक्के बांधकाम चौ.फूट | स्मिता लक्ष्मण कोल्हटकर | स्वाती शरद गोगटे |
| ९ | ५ | १९२०/९ | स्वामी दर्शन सोसा. | आर.सी.सी. पक्के बांधकाम चौ. फूट | मनोहर नारायणदास वलेच्छा | आशिष अरुण म्हात्रे |
| १० | ४ | ८३१/१० | ज्वेल्स ऑफ अलिबाग | आर.सी.सी. पक्के बांधकाम चौ. फूट | मिलिंद हरिश्चंद्र नाईक | मिलिंद हरिश्चंद्र नाईक सायली मिलिंद नाईक |
| ११ | १ | ७१/८ | कोवरी सोसा | आर.सी.सी. पक्के बांधकाम ३६० चौ. फूट | तानाजी लक्ष्मण भिलारे | प्रविण दिनानाथ पाटील |
| १२ | २ | १७८०/१२ | बालाजी टॉवर | आर.सी.सी. पक्के बांधकाम ६६४ चौ. फूट | प्रशांत नारायण आहेर | निशिकांत गजानन ठोंबरे |
| १३ | ३ | ३४२ | पंतनगर | आर.सी.सी. पक्के बांधकाम ६६४ चौ. फूट | सरस्वती वसंतराव कदम | संजय वसंतराव कदम |
| १४ | ३ | १७१९/६/७ | ओमकार सोसा | आर.सी.सी. पक्के बांधकाम ५६५+५६५ चौ. फूट | रविंद्र अनंत ढक्षीकर | रेश्मा रविंद्र ढक्षीकर |
| १५ | ३ | ३३१/४ | विजय सोसा | आर.सी.सी. पक्के बांधकाम ५८५ चौ. फूट | मंगला केशव रानडे | संदेश केशव रानडे |
| १६ | ५ | १२९२/३ | अनुप्रभा सोसा | आर.सी.सी. पक्के बांधकाम ५८५ चौ. फूट | ह्रदयनाथ श्रीधर म्हात्रे | रविंद्र कमलाकर गायकवाड |
| १७ | २ | १९३८/२ | सनराईस अपार्ट | आर.सी.सी. पक्के बांधकाम ६५० चौ. फूट | संजय प्रभाकर घरत व इतर | ओमकार रविंद्र माळी |
| १८ | २ | ९६७ | विद्यानगर पश्चिम | आर.सी.सी. पक्के बांधकाम ३२५ चौ. फूट | विजया मनोहर चितळे | मनोहर गोविंद चितळे व इतर |
| १९ | २ | १२२२/१ | लपालिकर रेसिडेन्सी | आर.सी.सी. पक्के बांधकाम ३२५ चौ. फूट | श्याम मारकड | सुनिता श्याम मारकड |

सही/-
**श्री. निलेश लक्ष्मण गावंड**
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत, चेंढरे
ता. अलिबाग, जि.रायगड

सही/-
**सौ. स्वाती सतिश पाटील**
सरपंच
ग्रामपंचायत चेंढरे
ता. अलिबाग, जि. रायगड

## म ह त्त्वा चे

### क्रिकेट स्पर्धेत २ एन अकादमीची आगेकूच

**पुणे** : अजिंक्य क्रिकेट क्लबच्या वतीने आयोजित स्वर्गीय अण्णा नेवरेकर स्मृती करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट करंडक स्पर्धेत साखळी फेरीत २ एन क्रिकेट अकादमी संघाने यंग स्टार क्रिकेट अकादमी संघाचा ३९ धावांनी पराभव करत स्पर्धेत आगेकूच केली. एके क्लब, साळुंबरे येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत पहिल्यांदा खेळताना संजय सुतारच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर २ एन क्रिकेट अकादमी संघाने २० षटकात ७ बाद १५३ धावा केल्या. यात संजय सुतारने ३८ चेंडूत ७ चौकार व एका षटकारासह ४८ धावा करून संघाचा डाव बळकट केला. वीर चोरडीयाने १८ तर वेदांत वावळे व भावेश चौधरी यांनी प्रत्येकी १५ धावा करून संजयला सुरेख साथ दिली.

### मोहन बागानचा हैदराबादला धक्का

**। गोवा । वृत्तसंस्था ।**

एटीके मोहन बागानने इंडियन सुपर लीगच्या सामन्यात टेबल टॉपर हैदराबाद एफसीवर २-१ असा विजय मिळवला. लिस्टन कोलासो (५६ मि.) व मनवीर सिंग (५९ मि.) यांच्या गोलच्या जोरावर मोहन बागानने विजय मिळवून २३ गुणांसह चौथ्या क्रमांकावर झेप घेतली. हैदराबादकडून जोएल चिएनिजे (६७ मि.) याने एकमेव गोल केला. हैदराबादची तीन सामन्यांची विजयी मालिका मोहन बागानने खंडित केली.

## स्मृती मानधना संघाबाहेरच

# भारताला मोठा धक्का

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय महिला क्रिकेट संघातील स्टार फलंदाज स्मृती मानधना न्यूझीलंड विरूद्धच्या एकमेव टी २० सामन्याला मुकली होती. न्यूझीलंडमधील कडक विलगीकरणाच्या नियमामुळे भारतीय संघातील अनेक खेळाडू टी २० सामन्यात खेळू शकले नाहीत. न्यूझीलंडमध्ये झालेला हा टी २० सामना भारताने १८ धावांनी गमावला. आता स्मृती मानधना टी २० सामन्याबरोबरच पहिल्या वनडे सामन्यालाही मुकण्याची दाट शक्यता आहे.

**भारत न्यूझीलंडविरूद्ध क्वीन्सटाऊनमध्ये १२ फेब्रुवारीपासून ५ वनडे सामन्यांची मालिका खेळणार आहे. ही मालिका न्यूझीलंडमध्ये मार्च महिन्यात होणाऱ्या वनडे वर्ल्डकपच्या तयारीसाठी महत्त्वाची मानली जात आहे.**



स्मृती मानधना बरोबरच भारतीय संघातील मेघना सिंग आणि रेणुका सिंग या देखील विलगीकरणात आहेत. त्याही टी २० सामन्यात खेळू शकल्या नव्हत्या. बुधवारी झालेल्या टी २० सामन्यात मानधनाच्या जागी यस्तिका भाटिया सलामीला उतरली होती. याबाबत बोलताना यस्तिकाने व्हर्च्युअल पोस्ट मॅच पत्रकार परिषदेत सांगितले की, मस्मृती, मेघना सिंग आणि रेणुका सिंग या न्यूझीलंड सरकारच्या कडक नियमानुसार अजूनही विलगीकरणात आहेत. सध्याच्या घडीला आम्ही इतकेच सांगू शकतो. दरम्यान, याबाबत बीसीसीआयकडून अजून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. न्यूझीलंडच्या प्रवासाबाबतच्या कडक नियमांमुळे या खेळाडूंना फटका बसला आहे.

### हार्दिक पंड्याच्या संघाचे नामकरण

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीगची नवीन फ्रेंचायझी अहमदाबाद संघाने आपले नाव जाहीर केले आहे. अहमदाबाद फ्रेंचायझी आयपीएलच्या १५ व्या हंगामात गुजरात टायटन्स या नावाने मैदानात उतरणार आहे. बुधवारी ही घोषणा करण्यात आली. अहमदाबादने हार्दिक पांड्याला आपल्या संघाचा कर्णधार बनवले आहे, तर शुबमन गिल आणि अफगाणिस्तानचा स्टार फिरकीपटू राशिद खान यांचाही या संघात समावेश करण्यात आला आहे. कोचिंग स्टाफमध्ये आशिष नेहरा आणि गॅरी, कर्स्टनचा समावेश आहे. यावर्षी आयपीएलमध्ये एकूण १० संघ असतील. यावेळी आयपीएलमध्ये मेगा लिलाव होत आहे. १२ आणि १३ फेब्रुवारी रोजी बंगळुरू येथे लिलाव होणार आहे.

# ९ वर्षांनंतर श्रीसंत उतरणार रणजीच्या रणांगणात

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

बीसीसीआयने रणजी ट्रॉफीचा यावर्षीचा हंगाम दोन टप्प्यांमध्ये विभागण्याचा निर्णय घेतला आहे. पहिला टप्पा १७ फेब्रुवारी सुरू होणार आहे. याच पार्श्वभूमीवर केरळ संघाची घोषणा केली गेली आहे. मागच्या मोठ्या काळापासून ज्याच्यावर क्रिकेट खेळण्यासाठी बंदी घातली गेली होती, तो एस श्रीसंत आता रणजी ट्रॉफीत पुनरागमन करणार आहे. केरळच्या रणजी संघात एस श्रीसंतलाही सामील केले गेले आहे.



**॥ केरळच्या रणजी संघात करणार सामिल**

१७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेसाठी श्रीसंतला केरळच्या संघात स्थान मिळाले आहे. केरळ संघाला त्यांचा पहिला सामना हरियाणा संघाविरुद्ध खेळायचा आहे. केरळ संघ ग्रुप बी मध्ये सामील आहे. ज्यामध्ये त्यांच्यासमोर बंगाल, विदर्भ, राजस्थान, हरियाणा आणि त्रिपुरा या संघांचे आव्हान असणार आहे. हे सर्व सामने बेंगलोरमध्ये पार पडतील. पहिल्या टप्प्यातील सामन्यांचे आयोजन मुंबई, बेंगलोर, कोलकाता, अहमदाबाद, त्रिवेंद्रम आणि चेन्नई या शहरांमध्ये केले जाईल.

श्रीसंत २०१३ आयपीएलदरम्यान स्पॉट फिक्सिंग प्रकरणात दोषी आढळला होता. त्यानंतर त्याच्यावर क्रिकेट खेळण्याची बंदी घातली गेली. मागच्या मोठ्या काळापासून तो कोर्टात लढा देत होता. अखेर २०२० मध्ये त्याची या आरोपांमधून निर्दोष सुटका केली गेली. आता चाहतेही त्याला तब्बल ९ वर्षांपेक्षा अधिक काळानंतर पुन्हा एकदा लाल चेंडूच्या क्रिकेटमध्ये पाहण्यासाठी इच्छुक आहेत. आयपीएल २०२२ च्या मेगा लिलावात शॉर्टलिस्ट केल्या गेलेल्या ५९० खेळाडूंमध्येही एस श्रीसंतचे नाव आहे. अशात मेगा लिलावात त्याने स्वतःची बेस्ट प्राइस ५० लाख रूपये ठेवली आहे. त्याच्यावर फ्रेंचायझींकडून बोली लागण्याची पूर्ण शक्यता आहे.

## पायरीचीवाडी क्रिकेट स्पर्धेत

# सुहास इलेव्हन संघाची बाजी

**। पाली /गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील श्री दत्तात्रेय क्रीडा मंडळ पायरीचीवाडी यांच्यावतीने अंडरआर्म स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातील इच्छुक ५० संघाने आपला प्रवेश नोंदविला होता.

या स्पर्धेतील अंतिम लढत सुहास इलेव्हन खवली आणि यारी दोस्ती या दोन संघात झाली. या अंतिम सामन्यात खवली संघ विजयी झाला. या संघास १० हजार रूपये व आकर्षक चषक, उपविजेता यारी दोस्ती संघास ७ हजार रूपये व आकर्षक चषक तर तृतीय जांभूळपाडा संघास ५ हजार रूपये व आकर्षक चषक तर चतुर्थ जागसुद देव पोटलज संघास आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.



# क्रिकेट स्पर्धेत परंडवाल अकादमीला विजेतेपद

**लायन्स क्लब ऑफ रहाटणी करंडकचे आयोजन**



**। पुणे । वृत्तसंस्था ।**

लायन्स क्लब ऑफ रहाटणी आणि लिओ क्लब ऑफ रहाटणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लायन्स क्लब ऑफ रहाटणी करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत विजेतेपदासाठीच्या लढतीत परंडवाल क्रिकेट अकादमी संघाने एम.जी स्पोर्टस् क्लब संघाचा ९ गडी राखून दणदणीत पराभव करत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

हजारे मैदान, मोशी येथे झालेल्या या स्पर्धेत अंतिम लढतीत निलय गुरवच्या अचूक गोलंदाजीच्या बळावर परंडवाल क्रिकेट अकादमी संघाने एम.जी स्पोर्टस् क्लब संघाचा ९ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा खेळताना निलय गुरव, आर्यन यादव व यश सुर्यवंशी यांच्या अचूक गोलंदाजीपुढे एम.जी स्पोर्टस् क्लब संघ २४.२ षटकात सर्वबाद ८४ धावात गारद झाला. ८४ धावांचे लक्ष प्रथमेश वाघमारेच्या नाबाद ३६ व आयुष म्हाळसकरच्या नाबाद २७ धावांसह परंडवाल क्रिकेट अकादमी संघाने १५.३ षटकात १ गडी गमावत ८५ धावांसह सहज पुर्ण करत विजेतेपद पटकावले. १९ धावात ३ गडी बाद करणारा निलय गुरव सामनावीर ठरला. स्पर्धेचे पारितोषिक वितरण प्रांतपाल एमजेएफ हेमंत नाईक, डिस्ट्रिक्ट चेअरपर्सन संतोष गायकवाड, झोन चेअरपर्सन एमजेएफ धनराज मंघनानी, लायन्स क्लब ऑफ पुणे रहाटणीचे अध्यक्ष प्रमोद भोंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

## संतोष कवळे यांना महाराष्ट्र राज्य

# जीवनगौरव पुरस्कार



**। अलिबाग । वार्ताहर ।**

डायनामिक युथ स्पोर्ट अकॅडमी मुंबई इंडिया तर्फे संतोष रामचंद्र कवळे नवगाव यांना अभिमान महाराष्ट्राचा उत्कृष्ट क्रीडा प्रशिक्षक जीवन गौरव पुरस्कार अभिनेता शशिकांत केरकर यांच्या हस्ते देण्यात आला.

संतोष कवळे हे कराटे उत्कृष्ट प्रशिक्षक असून त्यांनी राज्य, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय विद्यार्थी घडवलेत म्हणून हा पुरस्कार देण्यात आला. ते दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय कराटे परीक्षेत पंच आणि कोच परीक्षा पास आहेत. आता ते अलिबागमध्ये लाटी काठी कराटे ट्रॅडिशनल रेसलिंग या खेळाचे मुलांना प्रशिक्षण देतात.

# बांधनवाडी येथे मोफत शिक्षण हक्क प्रवेश कार्यशाळा



**। पनवेल । वार्ताहर ।**

अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभा, राष्ट्र सेवा दल रायगड आणि ग्राम संवर्धन सामाजिक संस्था बांधनवाडी यांच्या वतीने मधु-प्रमिला दंडवते संकुल, बांधनवाडी, पो. बारापाडा ता.पनवेल येथे एक दिवसीय शिक्षण हक्क कायदा व त्यातील तरतुदी या विषयावर प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

अखिल भारतीय समाजवादी शिक्षण हक्क सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. रमेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यशाळेत शिक्षणतज्ज्ञ प्राध्यापक शरद जावडेकर आणि सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, युसूफ मेहेरअली सेंटरचे प्रकल्प संचालक सुरेश रासम यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

सुरेखा खैरे यांनी १६ तारखेपासून सुरू होणाऱ्या पंचवीस टक्के मोफत प्रवेश प्रक्रियेविषयी संगणक प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेस पनवेल, पेण, खालापूर आणि अलिबाग तालुक्यातील तीस प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.



# म्हसळा गटशिक्षणाधिकारी पदी मंगेश साळी

**। म्हसळा । वार्ताहर ।**

मागील काही दिवसांपासून म्हसळा पंचायत समिती शिक्षण विभागात गटशिक्षणाधिकारी पदासह विस्तार अधिकारी आणि केंद्र प्रमुख ही पदे तातडीने भरावीत अशी म्हसळ्यातून मागणी जोर धरीत होती. रायगड जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या आदेशानुसार म्हसळा पंचायत समितीचे कृषी अधिकारी मंगेश गणपत साळी यांची या पदावर नियुक्ती केली असून साळी यांचे पंचायत समिती कर्मचाऱ्यांकडून स्वागत करण्यात आले आहे.

याप्रसंगी पंचायत समितीचे कक्ष अधिकारी चौधरी, कक्ष अधिकारी हेमंत माळी, विस्तार अधिकारी ग्रामपंचायत गायकवाड, बाक्कर, लिपिक नरेश विचारे, आनंद मासाळ, प्रकाश कोठावले आदि मान्यवर उपस्थित होते.




फेब्रुवारी महिन्यात छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पनवेलच्या जुन्या पुणे महामार्गावर पळस्पे फाटा येथे छत्रपती शिवाजी महाराज विविध प्रतिमा बनविण्याचे काम राजस्थानी कारागिरांकडून जोरदार सुरु असल्याचे दिसून येते.

# माजी विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक साहित्य वाटप

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील शाळेच्या विकासासाठी ओढ असलेले अडुळसे गाव या गावातील प्रत्येक तरुण वर्ग व ग्रामस्थ शाळेच्या विकासासाठी हातभार लावत असते याच भावनेतून या शाळेतील माजी विद्यार्थी सनील कदम व प्रियंका कदम या बहिण भावांनी राजिप अडुळसे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल, पेन हे शैक्षणिक साहित्य देऊन आपल्या शाळेचे ऋण व्यक्त केले आहे.



## प्रा. लोखंडे यांना पीएचडी पदवी प्रदान

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले योगेश यशवंत लोखंडे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची पीएचडी पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय, ठाणे जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँकामार्फत होणाऱ्या गृहकर्ज योजनांचा प्रभाव व परिणाम एक अवलोकनात्मक अध्ययन हा होता. या कामी त्यांना शंकरराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. के. पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# ॲड.संदिप बागडे पुरस्काराने सन्मानित

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील ॲड. संदीप बागडे यांच्या सामाजिक, साहित्यिक व अन्य क्षेत्रातील कामगिरीची दखल घेऊन त्यांना कोलाड टाइम्स न्यूज पोर्टलच्या वतीने एका भव्य कार्यक्रमात खा.सुनील तटकरे यांच्या हस्ते सन्मानाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

नंदकुमार मरवडे, कल्पेश पवार व केशव म्हस्के यांच्या संकल्पनेतून संपन्न झालेल्या या पुरस्कार सोहळ्याप्रसंगी ज्येष्ठ नेते नारायण धनवी, बाबुराव बामणे, रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, जिल्हा परिषद




सदस्य दयाराम पवार, पंचायत समितीच्या माजी सभापती सुनीता महाबळे, पंचायत समिती सदस्या सिद्धी राजिवले, गोवे सरपंच महेंद्र पोटफोडे, तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्षा प्रितम पाटील, युवा नेते राकेश शिंदे, संजय राजिवले, नरेंद्र जाधव, संजय मांडलुस्कर, मनोज शिर्के, सुशील शिंदे, श्रीकांत चव्हाण, अजित आंब्रुस्कर, उत्तम बाईत, संदीप जाधव, नरेंद्र पवार, सरपंच विशाखा राजिवले, उपसरपंच दीप्ती सानप, विश्वनाथ धामणसे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

# सोशल मीडियावर हॅशटॅग हिजाब, बुरखा ट्रेंड

**वर्षा मेहता**

**। अलिबाग ।**




शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी हिजाब घालण्यावरून वाढलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, बसवराज बोम्मई यांच्या नेतृत्वाखालील कर्नाटक सरकारने मंगळवारी सर्व हायस्कूल, महाविद्यालये आणि विद्यापीठांना तीन दिवसांची सुट्टी जाहीर केली.

राज्यभरातील विविध महाविद्यालयांमध्ये भगवे श्वाल आणि हिजाब परिधान केलेल्या विद्यार्थ्यांच्या गटांमध्ये हाणामारी होऊन हिजाब वादाचे अनेक ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नात रूपांतर झाले. हिजाबचा वाद आता फक्त कर्नाटक राज्यापुरता मर्यादित नाही, इतर राज्यांवरही या प्रकरणाचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

SOCIAL MEDIA पडसाद

मंड्या विद्यापीठातील ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी भगवी शाल परिधान करून घोषणाबाजी केल्याने हा वाद आणखीनच चिघळला. गेल्या एका आठवड्यापासून काही विद्यार्थी हिजाब परिधान करत असल्याचा दावा करत त्यांनी सांगितले की, जोपर्यंत मुलींनी हिजाब घालणे टाळले जात नाही तोपर्यंत ते मागे हटणार नाहीत.

पोलिसांनी मध्यस्थी करून तणाव निवळला. कर्नाटक उच्च न्यायालयाने मंगळवारी काही कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये हिजाब बंदीच्या प्रकरणावर सुनावणी करताना सांगितले की, ते तर्काने, कायद्याने चालतील, आवेशाने किंवा भावनांनी नव्हे. न्यायालयाने विद्यार्थ्यांना तसेच सर्वसामान्य जनतेला राज्यात शांतता राखण्याची विनंती केली.

सोशल मीडियावर धर्माच्या नावाखाली द्वेष पसरवणारी अनेक मते पोस्ट केली जात आहेत.

# आयसीसी वनडे रँकिंगमध्ये भारतीय महिला क्रिकेटपटूंचा बोलबाला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसीने) महिलांची वनडे रँकिंग जाहीर केली आहे. या यादीत टॉप ५ मध्ये दोन भारतीय महिला क्रिकेटपटूंना स्थान मिळाले आहे. २०२१ चा सर्वश्रेष्ठ महिला वनडे क्रिकेटपटूचा पुरस्कार पटकावणाऱ्या स्मृती मंधानाचा टॉप ५ मध्ये समावेश झाला आहे. तर भारतीय संघाची

**स्मृती मंधानाचा टॉप ५ मध्ये प्रवेश**

कर्णधार मिताली राज दुसऱ्या स्थानी कायम आहे.

ही रँकिंग जाहीर करण्यापूर्वी स्मृती मंधाना सातव्या स्थानी होती. आता ती दोन पाऊल पुढे सरकत ७१० रेटिंग पॉईंट्ससह पाचव्या स्थानी पोहोचली आहे. तर मिताली राज ७३८ रेटिंग पॉईंट्ससह दुसऱ्या स्थानी कायम आहे. तसेच ऑस्ट्रेलियाची फलंदाज एलिसा हेली ७४२ रेटिंग पॉईंट्ससह पहिल्या स्थानी कायम आहे. तर ऑस्ट्रेलियाची फलंदाज बेथ मुनी ७१९ रेटिंग पॉईंट्ससह तिसऱ्या आणि एमी सेटरवेट ७१७ रेटिंग पॉईंट्ससह चौथ्या स्थानी आहे.

## *झुलन गोस्वामी दुसऱ्या स्थानी*

***गोलंदाजांच्या यादीत भारतीय वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामी ७२७ रेटिंग पॉइंट्ससह दुसऱ्या स्थानी कायम आहे. तर ऑस्ट्रेलियाची गोलंदाज जेस जोनासेन ७७३ रेटिंग पॉइंट्ससह अव्वल स्थानी कायम आहे.***



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2021)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)